राष्ट्रीय प्रकाशन : ७

भारतीय राष्ट्रवाद

खंड—दुसरा

लेखक
प्रा. न. ना. भिडे,
एम्. ए., बी. एससी.

अनुवादक
" जिज्ञासु "

वसुधा साहित्य मन्दिर,
मुंबई, नागपूर, जबलपूर.

★

प्रथमावृत्ती

१९४७

★

मूल्य १। रुपया

संचालक प्रमुख
भास्करराव जोशी,
राष्ट्रीय संस्कृति मंदिर, गीर्वाण भुवन
मातालेन वॉकर रोड, नागपूर.

प्रथमावृत्ती, जानेवारी १९४७
मकर संक्रांत

भारतीय वीरांच्या प्रतिमा

आकार	कॅबिनेट	१५ रु. डझन
	पोस्ट कार्ड	६ रु. डझन

१	श्री छत्रपति शिवाजी	५	सम्राट समुद्रगुप्त
२	राणा प्रताप	६	वीर सावरकर
३	गुरु गोविंदसिंह	७	भारतीय राष्ट्रध्वज
४	सम्राट विक्रमादित्य	८	जरासंध

ठोक विक्रेत्यांना भरपूर कमीशन. उत्तराच्या पोस्टेजसह पत्रव्यवहार करा.

व सु धा सा हि त्य म न्दि र,
मुंबई, नागपूर, जबलपूर.

प्रकाशक :
व्ही. जे. जोशी,
बी. ए., एल. एल बी.
वसुधा साहित्य मंदिर, मुंबई.

मुद्रक :
क. वि. प्रयागी, B. Sc.
विजय प्रिंटिंग प्रेस,
महाल, नागपूर.

थोडसें पण महत्वाचें

Most of the greatest things done in life are done at a time when you are a little bit unpopular.

अर्नेस्ट बेव्हीन.

संकल्पित पुस्तिकेचा उत्तरार्ध वाचकांच्या हातीं देतांना आम्हांस मनापासून समाधान वाटत आहे. वस्तुतः हा भाग पूर्वार्धाबरोबरच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होता. पण कांहीं कारणांमुळें आम्हांस तसें करतां आलें नाहीं. उशिरा कां होईना पण हा भाग प्रसिद्ध करून संकल्पपूर्तीच्या समाधानांत आम्ही वाचकांची भेट घेत आहोंत.

आम्हांस या भागांतील बहुविध अपुरेपणाची पूर्ण जाणीव आहे. अनेक विषय त्रुटितपणानें हाताळले गेले आहेत. तरीही पूर्वार्ध व उत्तरार्ध हे दोन्हीही आतां वाचकांच्यासमोर असल्यामुळें लेखकाला काय प्रतिपादन करावयाचें आहे हें नीट लक्षांत येण्यासारखें आहे. प्रतिपादनाचा व विवेचनाचा त्रुटितपणा पत्करूनही ही पुस्तिका छापून जनतेसमोर ठेवणें अत्यंत इष्ट व अवश्य वाटलें. याचें कारण असें कीं, लेखकानें आपलें मत स्पष्टपणें, ठसठसीतपणें, साधार व सोपपत्तिक मांडलें आहे. आजपर्यंत या विषयांत जेवढें कांहीं लिहिलें गेलें आहे तें बहुश: संदिग्ध, या नाहीं त्या हेतूनें खुशामतीचें, बुचकळ्यांत टाकणारें, प्रसंगीं दिग्भ्रष्टही करणारें आणि सांगोपांगतेनें केलेल्या विवेचनाचा अभाव असणारें असें आहे. त्या मानानें या पुस्तिकेची मांडणी अभिनव व मौलिक तर आहेच पण त्यांत ठिकठिकाणीं उत्तम मार्गदर्शनही आहे. म्हणूनच आम्ही ती प्रसिद्ध करीत आहोंत.

यांतील मतें कोणास पटोत अगर न पटोत. उपहास करणारे खुशाल हांसोत, टिंगल करणारे खुशाल टवाळी करोत. त्यांतील कित्येक मतें सध्यांच्या प्रवाहांच्या अगदीं उलट आहेत असें स्पष्टपणें लक्षांत येऊनही

अगदीं निर्भीडपणें हें आम्ही प्रकाशितो आहोंत याचें मूळ एका उघड विचारांत आहे. आमच्या राष्ट्राच्या आयुष्यांतील आणीबाणीच्या या काळांत जें विवेक-मंथन चालूं आहे त्यांत प्रत्येकानें आपल्या कुवतीनुसार भाग घेणें अवश्यच आहे. सध्यांच्या होऱ्याच्या विरुद्ध हीं मतें आहेत म्हणून तीं उजेडांत येऊं न देतां तशींच खितपत पडूं द्यावींत हें कोणाही राष्ट्रीय घटकास रुचणार नाहीं. प्रचलित समजुतींच्या विरुद्ध आपले सिद्धान्त आहेत म्हणून अल्बर्ट एन्स्टीन गप बसला असता तर विज्ञानाची प्रगति तरी झाली असती का ?

भारतीयांना आपल्या राष्ट्रीयत्वाची नीट ओळख व पारख झाल्याशिवाय या भारतीय राष्ट्रांत नवीन जीवन फुलणें शक्य नाहीं ही गोष्ट आमच्या देशांतील अनेक पक्षोपपक्षांच्या सिद्धान्तांना धरूनच आहे. मुस्लिम लीगसारखें छुलविलेलें सुणें सोडून दिलें तर (छुलविणारा असेतोंपर्यंत हे प्राणी असेच वागणार !) कॉँग्रेस, कम्युनिस्ट, हिंदुत्ववादी यांच्या राष्ट्रीय तत्त्वज्ञानास भारतीयपणाची ओळख व पारख अवश्य आहे. कॉंग्रेसचे कित्येक विचारवंत भारताच्या वैशिष्ट्यानुसार नव-जीवन फुलविलें पाहिजे असें म्हणतातच. हिंदुत्ववादी पक्षांचाही एवढ्यापुरता सहयोग आहेच. खुद्द कम्युनिस्टांस देखील भारतीयपणा न सोडतांच कम्युनिझमचा प्रपंच विस्तारावयाचा आहे. रशियांतला माणूस कम्युनिस्ट झाला तरी तो जसा आपला रशियनपणा टाकूं शकत नाहीं त्याप्रमाणेंच भारतीय कम्युनिस्टही आपला भारतयिपणा टाकूं शकत नाहीं. कम्युनिस्ट रशियाचे पालटणारे आचार-विचार पाहिले म्हणजे ही गोष्ट स्पष्ट होते. आम्ही कम्युनिस्टांवर भारतीयत्वाचा बळेंच आरोप करीत नाहीं. त्यांच्या तत्त्वज्ञानांतून व व्यवहारांतूनच हा ध्वनि निनादत आहे. राष्ट्रीय वैशिष्ट्यें कायम राखणें हा तर स्टॅलिनवादाचा (Stalinism) मगज आहे. ब्रेस्ट-लिटोव्हच्या तहापूर्वी लेनिन असें म्हणाल्याचें सांगतात कीं, 'He is no socialist who

will not sacrifice his fatherland for the triumph of the social Revolution.' आज स्टॅलिनशाहींत रशियनपणाची प्रत्येक बारिक सारिक गोष्टींत इतकी आवर्जून स्मृति जागाविण्यांत येत आहे कीं जितकी जहाल राष्ट्रवादी राष्ट्रांतही पहावयास सांपडणार नाहीं. निःपक्षपाती व सूक्ष्म निरीक्षक म्हणून मान्य असलेल्या मॉरिस हिंडसनें आपल्या 'Mother Russia' मध्यें ही गोष्ट साधार व यथार्थ चित्रित केली आहे. (Russia Goes Russian.) कार्ल मार्क्स त्यांचा मूळ तत्त्वज्ञानी ना, पण त्याच्या नांवारेक्षांही, पुरातन इतिहासांतला राजा अलेक्झांडर नेव्हस्की याच्या जयजयकारानें गेल्या कांहीं वर्षांत रशियन लोकांत विलक्षण धैर्य–शौर्य उत्पन्न झाल्याचें निरीक्षक सांगतात. एखाद्या विवश राष्ट्रवाद्याप्रमाणें स्टॅलिनचीं भाषणें होत असून त्यांतील वाक्यें ठिकठिकाणीं जाहिरातीं-प्रमाणें फडकाविलीं जात आहेत. ओल्गा मिशकोव्हा नांवाच्या 'कॉम्सोमोल' या संघटनेच्या केन्द्रीय समितीच्या कार्यवाहिनीनें, 'तुम्ही कोणत्या सांच्याचा मानव घडवूं इच्छिता' या प्रश्नास जें उत्तर दिलें तें तिच्या अधिकारी-पणामुळें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. ती म्हणाली, 'First and foremost we want our Youth to be patriotic to love their country, their people, all the good things they did in the past......... Love of country is one of the most basic things in life and one of the most blessed. Without it a man has no place in society." (Mother Russia, p. 101) रशियन कम्युनिस्टांचा वाढता कडवा रशियनपणा पाहिला म्हणजे आम्हांलाही असें वाटतें कीं, आमचा कम्युनिस्ट हा कडवा भारतीय बनावा. कम्युनिस्ट रशियाच्या जीवन-मरणाच्या प्रसंगीं त्याच्या रशियनपणानें त्यास तारलें हें जर खरें असेल तर तीच गोष्ट भारतालाही कां लागूं नाहीं ? पण खेदाची गोष्ट ही आहे कीं, भारतीय कम्युनिस्ट आपल्याला भारतीय म्हणविण्यास लाजतो, त्याला तो कमीपणा वाटतो. मानवाची मानवता त्याच्या देशप्रीतींत आहे हें

अगदीं निर्भीडपणें हें आम्ही प्रकाशितो आहोंत याचें मूळ एका उघड विचारांत आहे. आमच्या राष्ट्राच्या आयुष्यांतील आणीबाणीच्या या काळांत जें विवेक-मंथन चालूं आहे त्यांत प्रत्येकानें आपल्या कुवतीनुसार भाग घेणें अवश्यच आहे. सध्यांच्या होऱ्याच्या विरुद्ध हीं मतें आहेत म्हणून तीं उजेडांत येऊं न देतां तशींच खितपत पडूं द्यावींत हें कोणाही राष्ट्रीय घटकास रुचणार नाहीं. प्रचलित समजुतींच्या विरुद्ध आपले सिद्धान्त आहेत म्हणून अल्बर्ट एन्स्टीन गप बसला असता तर विज्ञानाची प्रगति तरी झाली असती का ?

भारतीयांना आपल्या राष्ट्रीयत्वाची नीट ओळख व पारख झाल्याशिवाय या भारतीय राष्ट्रांत नवीन जीवन फुलणें शक्य नाहीं ही गोष्ट आमच्या देशांतील अनेक पक्षोपपक्षांच्या सिद्धान्तांना धरूनच आहे. मुस्लिम लीगसारखें छुलविलेलें सुणें सोडून दिलें तर (छुलविणारा असेतोंपर्यंत हे प्राणी असेच वागणार !) काँग्रेस, कम्युनिस्ट, हिंदुत्ववादी यांच्या राष्ट्रीय तत्त्वज्ञानास भारतीयपणाची ओळख व पारख अवश्य आहे. काँग्रेसचे कित्येक विचारवंत भारताच्या वैशिष्ट्यानुसार नव–जीवन फुलविलें पाहिजे असें म्हणतातच. हिंदुत्ववादी पक्षांचाही एवढ्यापुरता सहयोग आहेच. खुद्द कम्युनिस्टांस देखील भारतीयपणा न सोडतांच कम्युनिझमचा प्रपंच विस्तारावयाचा आहे. रशियांतला माणूस कम्युनिस्ट झाला तरी तो जसा आपला रशियनपणा टाकूं शकत नाहीं त्याप्रमाणेंच भारतीय कम्युनिस्टही आपला भारतयिपणा टाकूं शकत नाहीं. कम्युनिस्ट रशियाचे पालटणारे आचार–विचार पाहिले म्हणजे ही गोष्ट स्पष्ट होते. आम्ही कम्युनिस्टांवर भारतीयत्वाचा बळेंच आरोप करीत नाहीं. त्यांच्या तत्त्वज्ञानांतून व व्यवहारांतूनच हा ध्वनि निनादत आहे. राष्ट्रीय वैशिष्ट्यें कायम राखणें हा तर स्टॅलिनवादाचा (Stalinism) मगज आहे. ब्रेस्ट–लिटोव्हच्या तहापूर्वीं लेनिन असें म्हणाल्याचें सांगतात कीं, 'He is no socialist who

will not sacrifice his fatherland for the triumph of the social Revolution.' आज स्टॅलिनशाहींत रशियनपणाची प्रत्येक बारिक सारिक गोष्टींत इतकी आवर्जून स्मृति जागाविण्यांत येत आहे कीं जितकी जहाल राष्ट्रवादी राष्ट्रांतही पहावयास सांपडणार नाहीं. निःपक्षपाती व सूक्ष्म निरीक्षक म्हणून मान्य असलेल्या मॉरिस हिंडसनें आपल्या 'Mother Russia' मध्यें ही गोष्ट साधार व यथार्थ चित्रित केली आहे. (Russia Goes Russian.) कार्ल मार्क्स त्यांचा मूळ तत्त्वज्ञानी ना, पण त्याच्या नांवापेक्षांही, पुरातन इतिहासांतला राजा अलेक्झांडर नेव्हस्की याच्या जयजयकारानें गेल्या कांहीं वर्षांत रशियन लोकांत विलक्षण धैर्य-शौर्य उत्पन्न झाल्याचें निरीक्षक सांगतात. एखाद्या विवश राष्ट्रवाद्याप्रमाणें स्टॅलिनचीं भाषणें होत असून त्यांतील वाक्यें ठिकठिकाणीं जाहिरातीं-प्रमाणें फडकाविलीं जात आहेत. ओल्गा मिशकोव्हा नांवाच्या 'कॉम्सोमोल' या संघटनेच्या केन्द्रीय समितीच्या कार्यवाहिनीनें, 'तुम्ही कोणत्या सांच्याचा मानव घडवूं इच्छिता' या प्रश्नास जें उत्तर दिलें तें तिच्या अधिकारी-पणामुळें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. ती म्हणाली, 'First and foremost we want our Youth to be patriotic to love their country, their people, all the good things they did in the past......... Love of country is one of the most basic things in life and one of the most blessed. Without it a man has no place in society." (Mother Russia, p. 101) रशियन कम्युनिस्टांचा वाढता कडवा रशियनपणा पाहिला म्हणजे आम्हांलाही असें वाटतें कीं, आमचा कम्युनिस्ट हा कडवा भारतीय बनावा. कम्युनिस्ट रशियाच्या जीवन-मरणाच्या प्रसंगीं त्याच्या रशियनपणानें त्यास तारलें हें जर खरें असेल तर तीच गोष्ट भारतालाही कां लागूं नाहीं ? पण खेदाची गोष्ट ही आहे कीं, भारतीय कम्युनिस्ट आपल्याला भारतीय म्हणविण्यास लाजतो, त्याला तो कमीपणा वाटतो. मानवाची मानवता त्याच्या देशप्रीतींत आहे हें

वरील म्हणणें खरें असेल तर त्या दृष्टीनें भारतांतील कम्युनिस्टांत मानवता कमी आहे असेंच म्हणावें लागते. भारताच्या भूतकालाबद्दल, संस्कृतीबद्दल, भाषेबद्दल इ० गोष्टींबद्दल भारतीय कम्युनिस्टांची भूमिका भाडोत्री-पणाची आहे. कडक वाटत असेल तर 'भाडोत्रीपणा' असें आम्ही म्हणणार नाहीं. परंतु ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, भारतीय कम्युनिस्ट भारतीयपणाबद्दल उदासीन आहे; इतकेंच नव्हे तर तो कित्येकदां शत्रूही बनतो. असो.

सारांश, प्रत्येक पक्षाला भारतीय राष्ट्रीयत्वाचो नवीन राष्ट्रीय जोम उत्पन्न करण्याकारितां आवश्यकता असल्यामुळें, त्याचें स्वरूप काय आहे हें कळण्याची अत्यंत गरज आहे. ती पुरी करण्याचा एक छोटेखानी पण निःसंदिग्ध, ठसठशीत व निर्भिड प्रयत्न म्हणूनच या पुस्तिकेचें आम्हांस महत्त्व आहे. अशी पुस्तिका प्रसिद्ध करण्यांत आम्हांला समाधान वाटत असल्यास वाउगें नाहीं. सरते शेवटीं अशा प्रयत्नांत यश संपादण्याचें भाग्य परमेश्वरानें नेहमींच आम्हांस द्यावें एवढीच त्याच्या चरणीं नम्र प्रार्थना आहे.

प्रकाशक

लेखकाचे चार शब्द

या पुस्तकाचा पूर्वभाग 'आधुनिक राष्ट्रवाद' या नांवानें प्रसिद्ध झाला आहे. मूळ संस्कृत लेख 'किं राष्ट्रं कश्च राष्ट्रिय:' याच्या पूर्वार्धाचें भाषांतर व नामांतर करून तो मीच लिहिला होता. मराठी लिहिण्याचा चांगला सराव नसल्यामुळें तें भाषांतर तितकें समाधानकारक मलाच वाटलें नाहीं. म्हणून या लेखाच्या उत्तरार्धाचें भाषांतर मी माझे सुविज्ञ व व्यासंगी मित्र श्री. जिज्ञासु, 'धर्मवीर' नामक भूतपूर्व नियतकालिकाचे उपसंपादक, यांना विनंति करून त्यांचेकडून करवून घेतलें आहे व त्यांच्याच सल्ल्यानें त्याचें नामकरण 'भारतीय राष्ट्रवाद' असें केलें आहे.

दोषज्ञ वाचकांनी कृपाळूपणें दोष अवश्य दाखवावे अशी त्यांना नम्र विनंती आहे.

सागर
पौष पौर्णिमा १८६८. } न. ना. भिडे.

आमच्या अंतर्जीवनविषयक कल्पना

१. तपोमूलकता
२. यज्ञमयता
३. ईश्वरविषयक धारणा
४. कर्मतत्त्व
५. पुनर्जन्म
६. योगशास्त्र व तज्जन्य विविध क्रियायोग
७. स्त्रीविषयक धारणा
८. त्यागाची विशेष कल्पना

अनुक्रमणिका

खंड पहिला (पूर्वार्ध)

खंड दुसरा (उत्तरार्ध)

शुद्धिपत्र

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५	४	शाडळू	शांडुळू
,,	१२	चक्रानें	चक्राचें
,,	१९	अध्यात्म्याच्या	अध्यात्माच्या
६	१३	शाम्डुलम्	शाङ्गुलम्
२६	२२	बिबुनडी	बिनबुडी
२९	२०	to	ought to
३१	१३	decleres	dreams
३३	३	अवन्विपणा	अनन्वितपणा
४८	१४	Aexio	Alexis
६०	७	पूर्वंवृत	पूर्ववृत्त
६०	१२	तीतर	तर ती

ज्यामुळें अर्थहानि होत नाहीं अशीं कांहीं अशुद्धें बळेंच दुर्लक्षिलीं आहेत.

भारतीय राष्ट्रवाद

अर्थात्

आधुनिक भारताचा ध्येयवाद

ततो राष्ट्रं बलमोजश्च जातम्

ॐ

राष्ट्रीय प्रकाशन नागपूर.

आमच्या अन्तर्जीवनविषयक कल्पना

आजच्या हिन्दुत्वनिष्ठांचे राष्ट्रीयत्व परिस्थितिजन्य आहे हें लक्ष्यांत येण्यास फारसा विचार करण्याची गरज नाही. ज्या पद्धतीने आज आपल्या राष्ट्रीयत्वाची सिद्धी केली जाते त्या पद्धतीवरूनच हें स्पष्ट होतें. हिन्दुस्थानकरता मुसलमान लोक स्वार्थत्याग करावयास तयार नाहींत. त्यांना स्वतःचा असा स्वार्थ आहे. परन्तु हिन्दु मनुष्य मात्र स्वार्थत्याग करावयास सदैव तयार असून त्याला हिन्दुस्थानपरता दुसरा स्वार्थ नाही म्हणून हिंदूच खरे राष्ट्रिय आहेत. ही त्यांची राष्ट्रियत्वाच्या सिद्धीची आवडती पद्धति. म्हणजे त्यांच्या राष्ट्रियत्वाकरता मुसलमानांचा स्वार्थसाधूपणा ही आवश्यक अट होऊन बसली आहे. ह्या म्हणण्यांत कांहीं तथ्य नाही असे नाही. गेल्या ५० वर्षांचा भारताचा इतिहास या म्हणण्यास साधक असाच आहे. परंतु तात्विक दृष्ट्या ही पद्धति हीन आहे. त्यागात्यागावरून राष्ट्रियत्व ठरविणे अशास्त्रीय आहे. समजा उद्या मुसलमानांची ही वृत्ति नाहीशी झाली तर यांचें राष्ट्रियत्व सहजासहजी भुईंत मिसळून जाईल. असें घडणेंही कांही अशक्य नाही. परिस्थिति एकसारखी अव्याहत अशी कधीच नसतें. बरें, यांच्या, गाईची पवित्रता, हिंदु स्त्रियांचा मुसलमानांशीं विवाह करण्याची बाब, पुण्यभूमि इत्यादि अनेक गोष्टींचा विचार केला

तर त्यांतही परिस्थितीची उपाधिच मूळ कारण दिसते. मुसलमानांचा विरोध आहे म्हणूनच या गोष्टींचें त्यांना महत्व आहे; त्याबद्दल त्यांचे-जवळ कांही स्वयंभू मूल्य आहे म्हणून नव्हे. सारांश, आमचे हिंदुत्व-निष्ठ ज्या ज्या गोष्टींना राष्ट्रिय महत्व देतात त्या त्या सर्व गोष्टी परिस्थितीच्या कोंबडीने घातलेली अंडीं होत. ही कोंबडी मरून गेली कीं त्यांच्या राष्ट्रिय बाबीहि आपोआप मरून जातील. असें होण्याचें मूळ कारण हेंच आहे कीं, त्यांनी राष्ट्रियत्वाकडे तत्त्वदृष्ट्या पाहिलें नाही. या प्रश्नाचा तत्वदृष्ट्या विचार करावयाचा म्हटला म्हणजे हिंदूंच्या अंतर्जीवन-विषयक कल्पना काय आहेत हें पाहणें होय. आतां आपण त्याच प्रश्नाकडे वळूं.

हिंदूंचा इतिहास ज्या काळापासून उपलब्ध होतो त्या काळापासून एक गोष्ट निश्चितपणे अभ्यासकास दिसून पडते. ती ही कीं, आमचें राष्ट्रीयत्व कांही विशिष्ट तत्त्वविचारांतून उत्पन्न झालें आहे. आजचा बोल्शेविक रशियन समाज अस्तित्वांत येईपर्यंत जगाच्या इतिहासांत ही गोष्ट घडलेली दिसून येत नाही. मनुष्यजीवाच्या कल्याणाचा प्रथमतः विचार करून मग समाजरचना उभी केली ही प्रतिज्ञा, आजचा रशिया खेरीज करून, इतर कोणच्याही समाजानें केली नाहीं. ती फक्त हिन्दु समाजानेच केली. अथर्ववेदांत—“ भद्रमिच्छन्त ऋषयः स्वर्विदः । तपोदीक्षामुपसेदुरग्रे । ततो राष्ट्रं बलमोजश्च जातम् । तदस्मै देवा उपसंनमन्तु ” ही प्रतिज्ञा स्पष्टपणें निर्दिष्ट केली आहे. मनुष्याचें हित व्हावें या कळकळीने तपोदीक्षा घेऊन जगाचे यथार्थ स्वरूप आकलन केलेल्या ऋषींनी आमच्या राष्ट्राची निर्मिति केली आहे. आमचे राष्ट्र तपोजानित आहे, तपोवर्धित आहे. म्हणून आमच्या अन्तर्जीवन विषयक कल्पनांचें मुख्य सूत्र तप हें आहे. नुसतें राष्ट्रच काय, सारे विश्वच मुळी तपोमूल आहे. ऋग्वेद तर ‘ तपसस्तन्महिमा अजायत ’

असा उद्घोष करतो. भगवान मनूहि ' तपोमूलमिदं सर्वं'तपसैवासृजत्प्रभुः। तप ही विश्वाची किल्ली म्हणून सांगतो. हा तपोगौरव आमच्या राष्ट्रियत्वाचें मोठें वैशिष्ठय आहे. तप म्हणजे शुद्ध जीवाच्या ज्ञान व इच्छा यांच्या संगतीकरणांतून उत्पन्न होणारी प्रक्रिया. प्रक्रिया म्हटली कीं ती नियमबद्धच असली पाहिजे; आणि नियमबद्धता म्हणजे शास्त्रीयता. सर्व चराचर तपोमूल आहे. म्हणजे त्याच्या उत्पत्ति-स्थिति लयाला कांही तरी शास्त्रीय नियंत्रणें आहेत. ही सारी सृष्टी ही एक सशास्त्र घटना आहे. हा ' तपोमूलमिदं सर्वम् ' याचा मथितार्थ आहे. जगांतल्या यच्चयावत् घडामोडी, समाजांचे उत्कर्षापकर्ष, व्यक्तींचें जीवनमरण या सर्व घटनांकडे शास्त्र दृष्टींतूनच पाहिले पाहिजे हा आग्रह जगाच्या इतिहासांत पहिल्यापासून आमच्याच लोकांनी धरिला आहे. विश्वविषयक असो, समाजविषयक असो वा व्यक्तिविषयक असो, प्रत्येक प्रश्नाचें उत्तर ' तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते ' या पद्धतीनेच मिळतें हें रहस्य आम्हीच प्राचीन काळापासून ओळखलें आहे. आजची नानातऱ्हेची कोडीं आमच्यासमोर उपस्थित झालीं आहेत. यांचा यथार्थ उलगडा करावयाचा असेल तर तो शास्त्रदृष्टयाच केला पाहिजे असें आमचें राष्ट्रियत्व आम्हाला सांगतें. जे लोक शास्त्र बाजूला सारून या विविध कोड्यांचा उलगडा करूं इच्छितात ते आम्हांला आमच्या राष्ट्रियत्वापासून वंचित करतात असें मोठ्या खेदाने म्हणावें लागतें.

येथें एक शंका उपस्थित होण्याजोगी आहे. शास्त्रदृष्टीतून जगांतील सर्व घडामोडी पाहिल्या पाहिजेत असें जर बोल्शेव्हिक रशिया व तुमचें राष्ट्रियत्व या दोघांनाहि मान्य आहे तर तें तुमचें वैशिष्टय कसें ? या शंकेचे निरसन करण्यास कांही मोठया खोलांत जाण्याचीही जरूर नाही. बोल्शेविक रशिया ' We have made science as our

hand-maid ' अशी घमेंड जरी मारीत असला तरी त्याच्या विचारांत बरीचशी अशास्त्रीयता आहे. कित्येक महत्वाच्या प्रश्नांकडे तो दुर्लक्ष करतो, कांहीच्याकडे ग्रहदूषित दृष्टीने पाहतो, तर कांहींच्या बाबतींत भावडेपणा बाळगतो. याची थोडी कल्पना येण्यास Max Eastman चें ' Marxism—Is It A Science ? ' हें पुस्तक वाचलें तरी पुरें आहे.

तपोमूलता हेंच जगाचें स्वरूप असून जग ही एक नियमबद्ध प्रक्रियाच आहे हें तत्त्व आमच्या राष्ट्रियत्त्वाचें वैशिष्ट्य आहे याचें गमक आमची यज्ञ-संस्था ही होय. आमची शास्त्रीय दृष्टि परिपूर्ण आहे हें या यज्ञसंस्थेवरून विशद होतें. आमच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें या जगाची गति विकासोन्मुख आहे. ' पूर्णापासुनि ढळलेलें जग जातें पूर्णाकडे ' ही Bee कवीची काव्योक्ति अगदीं सत्य आहे. या स्वभावसिद्ध गतीस अधिक वेग देऊन आमच्या राष्ट्राचेंच काय, निव्वळ मानव्याचेंच काय, पण साऱ्या चराचर सृष्टीचें शक्य तितक्या अल्पकालांत विकसन घडवावयाचे हें यज्ञसंस्थेचें रहस्य आहे. गीतेने ' एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ' असें म्हणून ज्या बहुविध यज्ञाची यादी दिली आहे त्यावरून त्यांच्या व्यापक स्वरूपाची कल्पना येईल. आमचें राष्ट्र निर्माण करणाऱ्या ऋषींना अथर्ववेदाने ' स्वर्विद ' असें जें म्हटलें आहे त्यांत मोठें मर्म आहे. मानवांचें मंगल साधून देऊं इच्छिणाऱ्या ऋषींनी जी तपोदीक्षा घेतली तींत त्यांना एक फार मोठें सत्य प्रत्ययास आलें. आपल्याला जी सृष्टि दिसतें ती शाखारूप असून तिला कांहींतरी मूळ आहे व तें मूळ मानवास सामान्यतः अदृश्य आहे हा आलेला अनुभव त्यांना अतिशय महत्वाचा वाटला. त्यांना असें दिसून आलें कीं, या शाखारूपी दृश्य

विश्वास टवटवी आणावयाची झाली तर पाण्याचें सिंचन येथें करून उपयोगाचें नाहीं, तें सामान्यतः अदृश्य असणाऱ्या सृष्टींतच केलें पाहिजे. " हा उर्ध्वमूळ आहे। परि तो उन्मूळिला नोहे। येणेंचि हा होये। शाडळू गा।" या ज्ञानेशांच्या गोड ओवींत त्यांच्या साऱ्या अनुभवाचें सार संकलित करता येईल. मूळ आणि शाखा हे सलग असून यांचें जसें परस्पर संजीवन असतें तसेंच या दोन विश्वांचें आहे. यामुळेंच जगाचा विकास दोघांच्याही संजीवनांतूनच झाला पाहिजे हें यज्ञ संस्थेचें मूळ ठरलें. मूल सृष्टींत असलेल्या देवताशक्तींना शाखारूप सृष्टीने कांही गोष्टींचा पुरवठा करावयाचा व त्या पुरवठ्याचा नैसर्गिक परिपाक म्हणूनच त्या देवताशक्तीचा अवतार या सृष्टींत होऊन तिचा विकास व्हावयाचा असें हें चक्र आहे. (एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः। अघायुरिन्द्रियारामो...)या चक्रानें जो शास्त्रीय पद्धतीनें अनुसरण करणार नाहीं त्याचे जिणें व्यर्थ आहे, त्याच्या आशा फोल आहेत, त्याचें कर्म वंध्य आहे; एवढेंच काय पण तो स्तेन आहे असें यज्ञसंस्थेचें खडखडीत बजावणें आहे. यज्ञसंस्थेच्या या स्वरूपामुळेंच आमचें राष्ट्रियत्व आधिदैविक झालें आहे. तें तसें नसून आध्यात्मिक आहे असा जो समज आजचे विद्वान लोक पसरवीत आहेत तो गैरसमज आहे हें सांगणें कर्तव्यप्राप्त आहे. राष्ट्रियत्वाचा संबंध जगद्व्यापाराशीं असल्यामुळें तें आधिदैविक स्वरूपाचें आहे. अध्यात्म्याच्या दाराशीं समाजाला नेऊन उभें केलें कीं राष्ट्रियत्वाचें काम संपलें. अध्यात्माचा अनुभव घेण्यास जी पूर्व तयारी व्हावी लागते ती सर्व राष्ट्रियत्व घडवून देतें. पुढें ज्यानें त्यानें आपापली ब्राह्मी स्थिति गांठावी. ती जबाबदारी राष्ट्रियत्वावर नाही. असें असल्यामुळेंच राष्ट्रियत्व हें आधिदैविक आहे, आध्यात्मिक नाही. आधिदैविकतेची दुसरीहि एक बाब आहे.

ज्यू, ख्रिस्ती व इस्लामी या लोकांची ईश्वरविषयक कल्पना आपण पाहिलीच आहे. मार्क्सिस्टांची जगदंबा जी प्रकृति तिचें निश्चित रूपदर्शन त्यांनाही नीट झालेलें नसल्यामुळें त्यांचा विचार न करतां वर उल्लेखिलेल्या समाजांची ईशकल्पनाच आपण विचारांत घेऊं. त्यांचा देव व्यक्तीरूप असून तो सृष्टीच्या बाहेर कोठे तरी राहतो. सृष्टीचा व त्याचा कांहीच सलग [organic] संबंध नाहीं. न्यूटन-सारख्या मोठ्या शास्त्रज्ञाचा देवहि जगद्यंत्र एकाकाळीं सुरू करून त्याच्याबाहेर कुठेतरी बसलेला आढळून येतो. आमची कल्पना तशी नाही. Spinoza ची कल्पना तर आमच्या कल्पनेंत बसतेच. परंतु तिच्यापेक्षांहि आमची कल्पना अधिक व्यापक आहे.

आमची कल्पना अशी कीं, तो जगन्मय तर आहेच, किंबहुना तोंच जग असून जगाच्या बाहेरहि अनंत असा पसरलेला आहे. (अत्यतिष्ठद्दशाङ्गुलम्) विद्युत् दिव्यांत ओतप्रोत असूनहि त्याच्या बाहेर जशी आहे त्याप्रमाणेंच ही चिच्छक्ति जगांत ओतप्रोत भरलेली असून जगातीत अनंतत्वानें पसरलेली आहे. वरील समाजाप्रमाणें आमचा देव कोणी एक व्यक्ती नव्हे. ती चिद्रूप शक्ती आहे. अनेक देवता या तदंशरूप आहेत. ती शक्ति जगांत व जगाच्या बाहेरहि आहे. ती जगांत राहूनच जगाचे नियंत्रण करते. (यः पृथिव्यां तिष्ठन् पृथिवीं नियमयति यं पृथिवी न वेद ।) हें आमच्या देवाचें वैशिष्ठय आहे. सारें जगच मुळीं एक सशास्त्र घटना असल्यामुळें व जग ही या शक्तीचीच एक लीला असल्यामुळें आमचा देवहि शास्त्रीय शासनास बांधला गेला आहे. आमच्या देवास लहर ही चीज ठाऊकच नाही. शास्त्र हाच त्याचा स्वभाव. श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणें नभांत वावरणाऱ्या अणु-रेणूपासून तो अपरसृष्टीपर्यंत सारें राघवाचेंच स्वरूप असल्यामुळें या सर्वांचे विकसन शास्त्रनियमांस धरूनच होतें.

या चिद्धन इच्छामय शक्तीची परा प्रकृति म्हणजेच सारी जीवसृष्टि होय. 'या सृष्टीच्या द्वारेंच संपूर्ण जगाची मी धारणा करतो' असें भगवंतांनी सांगितलें आहे. या जीवसृष्टींत मनुष्य हा अत्युन्नत जीव आहे. हा जीव शिवच होय हें तत्व आमच्याच राष्ट्रीयत्वाचें आहे. इतर समाज मनुष्य जीवाला ही थोरवी देत नाहींत. मनुष्य जीवानें जर प्रयत्न केला तर तो साक्षात् देवच बनूं शकतो ही कल्पना इतरांत नाहीं. त्यांच्या कल्पनेप्रमाणें जीव देवाचा आवडता होऊं शकतो व देवाचें सांनिध्य मिळवूं शकतो पण देव होत नाही. मनुष्यजीवाला आमच्या शास्त्रानें एवढी थोरवी दिली आहे त्याचेंहि कारण आहे. मनुष्यजीवास कर्मस्वातंत्र्य आहे. कारण तो कर्ता आहे. जो कर्ता नाही तो भोक्ताहि होऊं शकत नाही. मनुष्यजीवाच्या ठिकाणीं स्वयंनिर्धार करण्याची शक्ती असल्यामुळें तो स्वतःचे प्रारब्ध स्वतःच घडवूं शकतो. 'ईश्वर कोणाला पाप देत नाही, पुण्य देत नाही.' आपापल्या अज्ञानामुळेंच जीव मोहवश होतात, असें जें गीतेनें म्हटलें आहे त्यावरून ही गोष्ट ठळकपणें मनांत भरतें. इतर समाज, देवच पाप पुण्य देतो, देवच स्वर्गनरकाचे अनुभव जीवास देतो, अशी कल्पना करणारे आहेत. आमची कल्पना अशी आहे कीं, देव हा फक्त कर्माध्यक्ष आहे, कर्ता व भोक्ता यांची जगाच्या नियमांस अनुसरून योजना करणारा तो आहे. जीवच स्वतःचें पापपुण्य, स्वर्गनरक उत्पन्न करतो, देव नव्हे. या वस्तुस्थिति ओळखल्यामुळेंच आमच्यांतच कर्मतत्व उदयास आलें. जीवाचें सर्व कर्मभोग या तत्वास धरूनच होतात. कर्मतत्वाचें स्वरूप असें आहे कीं, कर्त्यापासून निघालेली कर्मवीचि पुनः कर्त्याकडे भोगरूपानें परत येते. हे भोग उपभोगित असतांनाच मनुष्यजीव ' क्रियमाण ' कर्म निर्माण करीत असतो. पुनः त्याची वीचि उत्पन्न होते, व ती परत कर्त्याकडे येते. असें हे कर्मतंत्र

अखंड चालू असतें. परापरसृष्टि ही एक सलग वस्तु असल्यामुळें मनुष्य या सृष्टींत जें कर्म करतो तें अतीन्द्रिय सृष्टींत पसरून पुनः या सृष्टींत भोगरूपानें व्यक्त होतें. अशा प्रकारें कर्म करीत असतानांच मनुष्यजीव स्वतःत पालट घडवून आणीत असतो. या पालटांतही कांही क्रमबद्धता आहे. विकासाच्या मार्गास लागलेला जीव क्रमशःच परिणत होत असतो, व हे क्रम तो पुनर्जन्मांच्या द्वारें अनुभवीत असतो. विश्वविकासाची गति आवृत्तिमय असल्यामुळें जीवालाहि पुनरावृत्तीच्या फेऱ्यांतून प्रवास करीत जावें लागतें. ' अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ' या गीतावचनांत पुनर्जन्माच्या सिद्धान्ताचा व तद्वारें होणाऱ्या विकासाचा संक्षेपतः निर्देश आला आहे. विकासाची परिपूर्ण कल्पना आमच्याच लोकांना आल्यामुळें त्यांनी हें ओळखले कीं, एखाद्या जीवाचा अपवाद टाकला तर बहुतेक सारे जिव क्रमशःच परिणाम (Transformation) पावत जातात. म्हणून आमच्या संस्कृतीचें वैशिष्ठ्य पुनर्जन्म मानण्यांतच आहे.

जीवाचें क्रमशः विकसन करावयाचेंहि शास्त्र आमच्याचकडे उत्पन्न झालें. तें शास्त्र म्हणजे योगशास्त्र हें होय. आधुनिक जड संस्कृतीखेरीज करून इतर संस्कृतींत योगासारखा जो कांही भाग दिसतो तो या आमच्या शास्त्राचाच अवशेष आहे. हें शास्त्र मूळचें आमचेंच आहे याची साक्ष पाश्चात्य पंडितही आतां देऊं लागले आहेत. मंत्रयोग, राजयोग, हठयोग व ज्ञानयोग आणि यांचें मिश्रण होऊन झालेले अनेक क्रियायोग हा सारा योगशास्त्राचाच रूपविस्तार होय. आजचें रसायनशास्त्र ज्याप्रमाणें जडप्रकृतीची विविध रूपांतरें घडवून तीं मानवास उपकारक अशी करतें त्याप्रमाणेंच योगशास्त्रहि क्रमपरिणामानें जीवासह साऱ्या सृष्टीचें रूपांतर घडवून विकासोन्मुख

करतें. फरक येवढाच कीं—आणि तोच अत्यंत महत्वाचा फरक आहे.—रसायनशास्त्राची प्रकृति अत्यंत मर्यादित आहे व योगशास्त्राची प्रकृति अमर्यादित आहे. रसायनशास्त्र मनुष्यजीवांत बदल घडवूं शकत नाहीं. योगशास्त्राला मुख्यतः तेंच करावयाचें असतें. यामुळेंच मनुष्यजीव विश्वाचा खराखुरा ईश्वर बनूं शकतो. रसायनशास्त्राचें एवढें सामर्थ्य नाही. असें असलें तरी रसायनशास्त्र व योगशास्त्र यांची पद्धति एकच आहे. सृष्टीचे नैसर्गिक नियम समजाऊन घेऊन त्यांच्या आधारेंच मानवाचा फायदा करावयाचा व त्याच्या विकासाची गति त्वरित करावयाची ही दोघांचीहि पद्धति आहे. यावरून हें लक्षांत येईल कीं, योगी जरी झाला तरी त्यालाहि कांही शास्त्रबंधने आहेत. तो मन मानेल तसे चमत्कार करूं शकत नाही. रसायनशास्त्री ज्याप्रमाणें शास्त्रकक्षेंत राहूनच नानाविध चमत्कार करतो त्याप्रमाणेंच योगशास्त्रीहि करतो. 'मी म्हणतो त्या पद्धतींनेंच मला चमत्कार दाखविशील तरच तुझें शास्त्र खरें समजेन' असा आग्रह एखादा धरूं लागला तर त्याचें करणें शास्त्रसंमत नाही हें काय सांगावयास पाहिजे? योगशास्त्राचें क्षेत्र अत्यंत अफाट व सुक्ष्मही असल्यामुळें त्याचें निबंध रसायनशास्त्रापेक्षां जास्त खोल व सूक्ष्म असणार हें उघड आहे. रसायनशास्त्रांत प्रयोगशास्त्र्याच्या जीवाचा कांहीच संबंध नसूनहि त्याचे नियम व तदनुरूप घडणारे चमत्कार हे खोल व सूक्ष्म असतात, तर ज्यांत प्रयोगकर्त्याच्या जीवापासून तो सृष्टींतलि यच्चयावत् पदार्थांपर्यंत सार्‍यांचाच कर्मानुबंध असतो अशा योगशास्त्रांत त्यापेक्षांही अनेक पटींनें खोल व सूक्ष्म नियम आणि चमत्कार असणार हें स्पष्ट आहे. असें हें प्रचंड योगशास्त्र आहे व त्याचे प्रणेते केवळ आमचेच ऋषिमुनी आहेत.

आमच्या राष्ट्रियत्वानें स्त्रीजातीविषयीं जो विचार केला तोहि आमचें वैशिष्ट्य दाखविणाराच आहे. थॉमस मन्रोनें पार्लमेंट मधील एका भाषणांत एकदां असें म्हटलें आहे कीं, संस्कृति ही जर देवघेव करण्याजोगी गोष्ट असेल व तसें करण्यापासून राष्ट्राचा फायदा होत असेल तर इंग्लंडनें हिंदुलोकांपासून स्त्रीजातीविषयींच्या कल्पना अवश्य उचलाव्या. त्यांत इंग्लंडचें फार हित आहे. हें त्याचें म्हणणें अत्यंत मार्मिक व यथार्थ आहे. आमच्या राष्ट्रियत्वानें स्त्रीविषयक विचार अत्यंत मूलगामीपणानें केला आहे. असें म्हणावयास हरकत नाही कीं कोणच्याहि समाजाच्या संस्कृतीचा दर्जा ठरवावयाचा असल्यास तो समाज स्त्रीजातीविषयी जी कांहीं धारणा धरतो त्यावरून ठरविता येतो. स्त्रीच्या विकासाची अन्तिम अवस्था मातृत्व ही आहे हें आमच्या स्त्रीविषयक धारणेचें मर्म आहे. जगांतल्या इतर संस्कृति, आधुनिक विज्ञानें व अत्र्यासारखी धर्मलंड माणसें 'स्त्री ही क्षणाची पत्नी असते व नित्याची माता असते' हें कबूल करतात, परंतु त्यांच्या व आमच्या म्हणण्यांत मूलतः फरक आहे. अपत्यजनन व अपत्यसंगोपन हें त्यांच्या मातृत्वाचें सार आहे. आमचें मातृत्व याची गणना करून पुढें जाणारें आहे. **स्त्रीची नित्यप्रकृति मातृत्व ही आहे** याचा अर्थ आम्हांस असा वाटतो कीं, 'स्त्रीची यथार्थ वाढ झाली तर तिला स्वतःच्या पतीसकट सारी मनुष्य जात आपल्या वत्सलतेनें न्हाऊन टाकतां आली पाहिजे व तिच्याविषयीं पुरुषाच्या अंतःकरणांत, ही एक उपभोग्य वस्तु आहे हा कामगंधहि शिवला न पाहिजे. ' स्त्री ही काय चीज आहे हें देवदर्शन झाल्याशिवाय कळत नाही ' असें श्रीरामकृष्ण परमहंसांनीं एकास उत्तर दिलें होतें. या उत्तरांत आमच्या स्त्रीविषयक धारणेचें सारें तत्व आलें आहे. स्त्रीचें सत्यस्वरूप कळावयास देवदर्शनासारखी पायरी गांठावी लागते याचा अर्थ असाच असू शकतो कीं, स्त्री ही दिव्यतेची खाण

आहे. ही धारणा जगांतल्या कोणच्याहि समाजाची नाहीं. आजचे सारे स्त्रीविषयक प्रश्न वस्तुतः या धोरणानेंच सोडविले गेले पाहिजेत. तसें ते सोडविले न गेले तर आम्ही आमच्या राष्ट्रियत्वापासून भ्रष्ट होत आहोंत असाच त्याचा अर्थ होईल. दुःखाची गोष्ट आहे कीं, आजचे सारे एतद्विषयक विचार, आम्ही भ्रष्ट होत आहोंत, असेंच सुचवीत आहेत.

अन्तर्जीवनविषयक कल्पनांना अनुसरून आमचें जें बहिर्जीवन घडते त्याचें सूत्र त्याग हें आहे. म्हणून त्याग ही एक आमच्या राष्ट्रियत्वाची विशेष खूण आहे. खिश्चन संस्कृति खेरीज करून, गत व वर्तमान साऱ्या संस्कृति भोगाला प्राधान्य देणाऱ्या आहेत. खिश्चन संस्कृतीनें आपल्यासमोर त्यागाचें तत्व ठेवलें होतें. पण त्यांच्या त्यागकल्पनेंत व आमच्या त्यागकल्पनेंत महदन्तर आहे. आमच्या त्यागाचें सार निःसंगता आहे व त्यांच्या त्यागाचें सार वर्ज्यता हें आहे. 'Give unto Ceasre the things that are Ceaser's हा खिस्तोपदेश हेंच सुचवितो. आमची त्यागाची कल्पना थोडक्यांत अशी आहे. एखादा विद्यार्थी उशीर झाल्यामुळें परीक्षागृहाकडे अत्यंत घाईने जात असतो. त्याचें सर्व लक्ष त्या गृहाकडेच केन्द्रित झालेलें असतें, त्याचे मन तेथेंच असतें व शरीर रस्त्यानें चालू असतें. असें असून कार्यकारणापुरता विचार ठेवून वहातुकीच्या गर्दीतून जातांना तो सर्व आवश्यक ते व्यापार करीत असतो. परंतु ते सर्व व्यापार अलिप्ततेनेंच होतात. त्या व्यापारांत त्याची गोडी नसते. त्यागी माणसाची वृत्तीहि अशीच असते. तो आवश्यक तेवढे सर्व जगद्व्यापार करीत असतो; परंतु त्याचें चित्त अन्तर्जीवनांत मग्न असतें. यामुळेंच त्याचें सर्व व्यवहार निःसंग होतात. अशा निःसंगतेनें सारें बहिर्जीवन घालविण्याची

शिकवण आमच्याच राष्ट्रियत्वानें दिली आहे. वाटचालीपुरताच भोग घ्यावयाचा, एरव्हीं सारें जीवन त्यागमय करावयाचें अशा प्रकारेंच मनुष्य तेजस्वी बनतो असें आमच्या संस्कृतिचें प्रतिपादन आहे. भोग भोगाकरता नसून त्यागाकरता आहेत ही शिकवण अंगीं मुरल्यामुळेंच आमची राज्यसंस्था व आमचे आर्थिक व्यवहार जगास उपकारक असेच झाले.

थोडक्यांत आमच्या अन्तर्जीवनविषयक कल्पना या अशा आहेत. या खोट्या आहेत असें 'तुष्यतु दुर्जनः' न्यायानें मानलें तरी त्यांचा परिणाम एक अपूर्व मनुष्यजाति उत्पन्न करण्यांत जर होतो तर त्यांचा अव्हेर कां करावा हें समजत नाही. यासंबंधी Aedous Huxley नें जे उद्गार काढले आहेत ते अत्यंत मननीय आहेत. " The fruits of such doctrines as are taught by Luther and St. Augustine are war and organised malice of religious persecution and the organised falsehood of dogmatism and censorship. On this point it seems to me – the historical evidence is clear and explicit – those who consider that the metephysical theories of Luther and Augustine correspond more closely to the nature of ultimate reality than do the theories of Eckhast, Shanker or the Buddha must de ready to affirm the proposition that evil is the result of acting upon true beliefs about the universe and that good is the result of acting upon false beliefs. "(Ends and Means. p. 329)

अन्तर्जीवनविषयक कल्पनांची योग्यता जर परिणामावरून ठरवावयाची असेल तर असेंम्हणणे प्राप्त आहे कीं, आमच्या अन्तर्जीवनाविषयक

कल्पना वास्तविक नाहीत असें धरले तरी, त्यांच्या आधारें जर आम्हाला मानवाचा एक अभिजात नमुना उत्पन्न करता येतो तर त्यांचा आम्ही अवश्य अंगिकार करणार. ही आमची कृति अशास्त्रीय ठरूं शकत नाही. आजच्या गणितशास्त्रांतील $\sqrt{-1}$ सारखे काल्पनिक आंकडे पदार्थशास्त्रास मान्य असतात, कारण त्यांच्या आधारें शास्त्रज्ञास योग्य ते निर्णय हस्तगत करता येतात. शास्त्रज्ञांच्या व आमच्या रीतींत तत्वतः कांहीच फरक नाही. आतापर्यंत कोणालाहि घडविता आला नाही असा मानवी नमुना आम्ही घडविला आहे यावरूनच आमच्या अन्तर्जीवनविषयक कल्पनांची सफलता दिसून येईल. त्यांनी तो कसा घडविला हें संक्षेपतः पाहूं.

मानवांत असलेला पशु मधूनमधून डोकें वर काढून त्याची सांस्कृतिक कमाई उध्वस्त करून टाकतो म्हणून कांही तेवढ्यावरून त्याने कांही सांस्कृतिक कमाईच केली नाही असें होत नाही. त्या कमाईच्या अवस्थेंत त्यानें जी उन्नति अनुभवली असेल तीच विचारांत घ्यावयाची असतें; अवनति आली म्हणून ती उन्नति कांही व्यर्थ ठरत नाही. आमच्या राष्ट्रियत्वानें जो मानवी नमुना उत्पन्न केला तो पहावयाचा झाल्यास, आजचा अवनतीचा काळ सोडून, उन्नतीच्या कालातच पदार्पण केलें पाहिजे. आज आम्ही अवनत आहोत म्हणून पूर्वी कधीं उन्नत नव्हतोच असें जर एखादा दुराग्रही म्हणत असेल तर तें त्याचे त्यास लखलाभ असो. शास्त्रीय प्रतिपादनांत अशा दुराग्रहाचा कधींच विचार करावयाचा नसतो. असो. तपाची कल्पना अंगीं मुरल्यामुळें आमचा समाज जगाच्या यच्चयावत् घटनेकडे शास्त्रदृष्टीनें पाहूं लागला. जगांतली प्रत्येक घडामोड शास्त्रानियत असते म्हणून, समाजाच्या उत्कर्षापकर्षांचा विचार देखील शास्त्रपूतच असला

पाहिजे ही त्याची ठाम समजूत तपाच्या कल्पनेनेंच झाली. जीवनविषयक प्रत्येक प्रश्न शास्त्राच्या निकषावरच घांसून पहाण्याची त्याची प्रकृति यामुळेंच झाली. व्यक्तीच्या खाजगी जीवनापासून मानवाच्या मोठमोठ्या घडामोडीपर्यंतची प्रत्येक गोष्ट नियत असल्यामुळें त्यानें बारीक सारीक गोष्टीचेंहि शास्त्र बनविलें आहे. आधुनिकांस नडणारे विधिनिषेधांचे विस्तृत जाळें शास्त्रदृष्टीमुळेंच उत्पन्न झालें आहे. 'शास्त्र म्हणेल जे सांडावें। तें राज्यहि तृण मानावें। जें घेववी तें न म्हणावें। विषही विरूं'। (ज्ञानेश्वरी) हा विज्ञानवाद्यासही लाजविणारा शास्त्रप्रामाण्याचा महिमा या राष्ट्रियत्वातच जो उत्पन्न झाला तो तपाच्या कल्पनेंमुळेंच झाला.

यज्ञाचें मूळ तत्व काय आहे हें आपण पाहिलेंच आहे. जीव व विश्व यांचा युतावयव संबंध असल्यामुळें मानवाचें प्रत्येक कर्म विश्वविकास दृष्टीसमोर ठेवूनच झालें पाहिजे, असें आमच्या राष्ट्रित्वयाचें ठसठशीत बजावणें असल्यामुळें आमचा मानव स्वभावतःच स्वार्थत्यागी बनला. आमच्या संस्कृतीखेरीज इतर ज्या संस्कृती परलोकाचें अस्तित्व मानतात त्यांच्यांत व आमच्यांत त्याबाबत फार मोठा फरक आहे. इहलोक व परलोक हे दोन डबे आहेत अशी त्यांची कल्पना. या दोन डब्यांचा परस्पर संबंध काहीच नाही, हे अपरस्परसंभूत आहेत अशी त्यांची समजूत. ते परस्परसंभूत आहेत अशी आमची कल्पना. यामुळें हें इहलोकचें कर्म व हें परलोकचें कर्म असा कर्मभेद आमच्यांत नाही; आणि यामुळेंच आमचा मनुष्य ज्या ज्या वेळीं कर्म करतो त्या त्या वेळेला तें सारें इहपरमयच असतें. यज्ञार्थाशिवाय केलेलें कर्म बंधनकारक असतें, विकासकारक नसतें हें त्याच्या मनांवर पूर्णपणें बिंबलेलें असल्यामुळें, त्याचें कर्मशास्त्र व समाजशास्त्र इतरांहून सर्वथैव भिन्न आहे. आणि झालें

यामुळेंच आमचा मानव व्यापक दृष्टीनें कर्म करणारा झाला आहे. विश्वाच्या उन्नतीस मदत केल्यशिवाय जो मनुष्य आपल्या पोटांत घांस घालतो तो अन्न खात नसून केवळ पापच खातो ही उदात्त कल्पना निव्वळ आमचीच.

आमच्या देवकल्पनेनेंही अभूतपूर्व मानव उत्पन्न करण्यांत फार मोठी कामगिरी बजाविली आहे. विश्वबंधुत्वाची यथार्थ कल्पना त्यामुळेंच आमच्यांत मुरली. जीवजात ईशमयच आहे, या जिवंत जाणिवेमुळेंच. कोरडी भाकर तोंडांत धरून पळणाऱ्या कुत्र्यामागें तुपाची वाटी घेऊन हळहळत धांवताना नामदेव दिसतात. 'परपीडक तो आह्मा दावेदार। विश्वीं विश्वंभर ह्मणूनिया'। ही विश्वबंधुत्वाची उदात्त भावना या ईश-कल्पनेतूनच उगम पावली आहे. आब्रह्मस्तम्बपर्यंत सारें देवाचेंच नट-नाट्य असल्याची जिवंत निष्ठा असल्यामुळें आमचा मानव सृष्टी-व्यापाराविषयीं बेपर्वा राहूं शकत नाहीं. इतर संस्कृतीचा देव जगाच्या बाहेर असल्यामुळें त्याची उपासना करणारा मानवही जगाशीं अत्यंत तुसडेपणानें व अत्यंत बेपर्वाईनें वागणाराच झाला हें इतिहासच आपणास शिकवितो. कॅथोलिकसारख्या कांही पंथांत मोठमोठे साधुसंत चमकून गेलेले दिसून येतात यांत कांही शंका नाही. परंतु असें होण्याचें बीज त्यांच्या निसर्गदत्त मोठेपणांत होते. त्यांच्यासमोर कोणतीहि ईशकल्पना नसती तरीहि ते तेवढेच मोठे झाले असते. अशा कांही विरळ व्यक्ति सोडून दिल्या तर बहुसंख्य जनता वर उल्लेखिलेल्या ईशकल्पनेच्या सांच्यांतूनच बाहेर पडलेली होती च आजही तसेंच दृश्य दृष्टोत्पत्तीस येतें. आमचा देव इतरांच्या देवाप्रमाणें खूष अथवा नाखूष होऊन जीवास पापपुण्य अगर स्वर्गनरक देत नाही. त्यानें जीवालाच कर्तृत्वाचा अधिकार दिला असल्यानें आमचा मानव देवलम्बी न बनतां आत्मावलम्बी झाला. ' उद्धरेदात्मनात्मानं

नात्मानमवसादयेत् ' वगैरे श्लोकांत हेंच तत्व ग्रथित केलें आहे. मानव प्रतिसृष्टीहि उत्पन्न करूं शकतो एवढें त्याचें सामर्थ्य आहे ही जी आमची ठाम समजूत झाली आहे त्याचें कारणहि ही ईशकल्पनाच होय. जीव हा शिवच होय व त्यामुळें तो अलम दुनियेचा अधिपति होऊं शकतो हें तत्वही या ईशकल्पनेचेंच अव्यभिचारी अंग आहे. शास्त्र व देव या अभिन्न गोष्टी असल्यामुळें एखाद्यानें एखाद्याने ईशानुसरण न करतां केवळ शास्त्रानुसरण केलें तरी त्याच्या पदरांत ईशता टाकलीच पाहिजे हें बंधन स्वखुषीने पाळणारा आमचाच देव आहे. इतरांत शास्त्रीय कर्म अशी बाबच नाही. देवाच्या आज्ञा पाळून त्याला खूष करणें हेंच त्यांच्या कर्मविधींचें स्वरूप होय. यामुळेंच आमचा मानव व इतर समाजांच्या मानव यांत महदन्तर पडलें आहे.

लोकान्तीं व एकान्तींहि नीतिमत्तेनें वागणारा मानव उत्पन्न करण्यांत **कर्मतत्वाचा** आम्हांस अतिशय उपयोग झाला आहे. नीतिमत्तेचें मूळ कशांत आहे याबद्दल विचारवन्तांत प्राचीनकाळापासून भवति न भवति होत आली आहे. नीतिमत्तेचें मूळ समाजांत असतें ही आधुनिकांची ठाम समजूत झाली आहे. आमचें राष्ट्रियत्व असें सांगतें कीं, नीतिमत्तेचें मूळ समाजांत नसून व्यक्तींत आहे. व्यक्तीनें जगाशी नीतिमत्तेनें कां वागावें याचें कारण आमचें राष्ट्रियत्व असें सांगतें कीं, व्यक्तीनें उठविलेल्या कर्मवीचि अनैतिक असल्या तर त्या अनैतिक फळ घेऊनच कर्त्याकडे परत येतात व त्यामुळें त्याच्या विकासाच्या मार्गांत अडथळे उत्पन्न होतात. ही जाणीव कर्मतत्वामुळेंच आमच्यांत उत्पन्न झाली. यामुळें आमचा मानव स्वायत्त बनला आणि स्वायत्ततेमुळेंच त्याच्या सर्व शक्तींचा विकास घडून आला.

कर्मतत्वाशी संलग्न असलेल्या **पुनर्जन्म** कल्पनेनेंहि आमच्या मानवास विशेष वळण लावलें आहे; आणि तें वळण ह्मणजे भेद

सहन करणें हें होय. विषमता हा सृष्टीचा स्वभावच आहे. कितीही प्रयत्न केले तरी समता उत्पन्न करणें अशक्य आहे ही गोष्ट मार्क्सिस्टांनाही मान्य आहे. परंतु त्यांची हीच चूक होते कीं ते विषमतेचें सारें खापर परिस्थितीच्या माथीं फोडतात. त्यामुळेंच, जुलमाचा अवलम्ब करूनही परिस्थिति बदलविलीच पाहिजे हा दुराचार त्यांच्यांत वाढला व क्रान्तिद्वाराच समाजाची उन्नति होते हा भ्रमही त्यांनी उराशीं कवटाळला. पुनर्जन्मानें आम्हांस असें शिकविलें कीं, अखिल सृष्टीचा विकास होत असला तरी सारे जीव एकाच पातळींत नाहींत. त्यांत अधिकारभेद आहेत. जगांत दिसणारी विषमता मौलिक स्वरूपाची आहे, निव्वळ परिस्थितिजन्य नाहीं. परिस्थितिजन्य विषमता घालविणें शक्य आहे व योग्य आहे. परंतु नैसर्गिक विषमता जगांत रहाणारच व ती अपरिहार्य असल्यामुळें ती निर्मूल करणेंही अशक्य आहे. असें असल्यामुळेंच समाजानें अपरिहार्य विषमता स्वखुषीनें सहन केली पाहिजे. जुलूमजबरदस्तीनें समाज कधींच पुढें जात नसतो, उलट तो परागतिक होतो हा व्यावहारिक शहाणपणा सर्वांगानें आम्हांला पुनर्जन्माच्या तत्वानें पूर्णतेनें शिकविला. यामुळेंच आमचा मानव अत्यंत सहिष्णु झाला आहे.

योगशास्त्र व तज्जन्य विविध क्रियायोग यांनीही भिन्न मानवी नमुना तयार करण्यांत मौलिक भर घातली आहे. पातंजल योगानें ईश्वरास विकल्पास काढून मानवाला प्रकृतीचा मालक बनण्याची हातोटी साधून दिली आहे. आमच्या साऱ्या राष्ट्रियत्वासच ही गोष्ट लागू आहे. म्हणूनच ईश्वर न मानणारा सांख्यवादीही आमच्या राष्ट्रियत्वाचा घटक यथार्थपणें होऊं शकतो. प्रकृतीची हवी तशी (म्हणजे शास्त्रविरुद्ध नव्हे) घड-मोड करण्यास शिकवून योगशास्त्रानेंच आमच्या मानवास मोठा प्रयोगशास्त्री बनविलें आहे. यामुळेंच आमचें तत्वज्ञानही केवळ तर्ककर्कश ज्ञान-मीमांसा न होतां ती एक सोलीव अनुभवाची गोष्ट झाली आहे. ज्ञान

हेंही कर्मरूपच आहे हें आम्हांस योगशास्त्रानेंच शिकविलें. यामुळेंच असें म्हणता येतें कीं, आमच्या मानवाइतका कर्मपर मानव दुनियेंत कोणीच नाही. 'चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे' ही ओवी या कर्मपरतेची निःसीमता दाखविते. आजचा विज्ञानवादी स्वतःस कर्मयोगी म्हणवीत असला तरी त्याच्या योगांतून कितीतरी कर्में सुटून गेलीं आहेत. सारे अतीन्द्रिय अनुभव मिथ्या आहेत असें स्वतः प्रयोग न करतांच त्यानें जें ठरविलें आहे तें या म्हणण्यास साक्षभूत आहे. आमच्या मानवानें अशा प्रकारच्या कोणत्याच मर्यादा घालून घेतल्या नाहीत. त्यामुळेंच सर्व तऱ्हेचे अनुभव घेऊन त्याला अनेक आधिभौतिक व आधिदैविक शास्त्रांचा प्रचंड प्रपंच करतां आला.

आमच्या स्त्रीविषयक कल्पनांचा परिणाम हिंदु स्त्रीपुरुषांवर व पर्यायानें जगावर कसा झाला आहे हें पाहिलें म्हणजे त्या कल्पनेची महती मनावर बिंबल्याशिवाय रहात नाहीं. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' हा उद्गार या कल्पनेचाच परिपाक होय. समोर आर्त होऊन आलेल्या लावण्यरूप रमणीस 'तूं माझी आई आहेस' असें निर्विकारतेनें म्हणण्याइतकी, जगज्जेत्या शूरालाही दुर्लभ असणारी वीरता अर्जुनापासून तों सेनापति बापटापर्यंत परंपरेनें प्रकट झालेलीं दिसते याचें कारणदेखील ही कल्पनाच होय. ही झाली पुरुषाची गोष्ट. आमच्या स्त्रीनें जें आर्यत्वाचें तेज जगभर उधळलें आहे त्याचेंही बीज याच कल्पनेंत आहे. अनेक परकी राष्ट्रांनीं आमच्या स्त्रीजातीचा ध्यास धरलेला दिसून येतो. यावरूनच ही गोष्ट सिद्ध होते कीं, आमच्या स्त्रीजातीनें परकीयांच्या अंतःकरणावर आपल्या श्रेष्ठपणाचा अपूर्व प्रभाव टाकला होता. मागें उध्दृत केलेलें Sir Manro याचे वचन हें म्हणणें निखालसपणें सिद्ध करतें. स्त्रीस्वभावाचे सारे गुणदोष लक्ष्यांत घेऊन त्यांच्या वाढीची जी दिशा आजचीं विज्ञानें सांगतात ती दिशा

आमच्या राष्ट्रियत्वानें पूर्वीपासूनच जगास यशस्वीपणें दाखविली आहे. यावरूनही आमच्या कल्पनेची श्रेष्ठता सिद्ध होत आहे. विज्ञानाचे सिद्धान्त अजून विचारसृष्टींतच आहेत; आमच्या सिद्धातांनीं हजारों वर्षें प्रत्यक्ष सृष्टींत मानवी नमुने उत्पन्न केले आहेत.

आमच्या त्यागाच्या विशेष कल्पनेनें समाजाचा व्यवहार अत्यंत सुकर करून दिला आहे हें थोड्या विचारांनींही लक्ष्यांत येण्याजोगें आहे. पुनर्जन्माच्या कल्पनेनें आमच्या व्यवहारांतून जुल्म व अत्याचार यांची जशी हकालपट्टी केली तशीच आमच्या त्यागाच्या कल्पनेनें नैसर्गिक विषमता कमीतकमी तीव्र करून अन्यायाची हकालपट्टी केली. धनवन्त असूनही जर दान करीत नसेल तर त्याच्या गळ्यास शिळा बांधून त्यास समुद्रांत बुडवावें ही आत्यन्तिक वाटणारी विचारसरणी या त्यागाच्या कल्पनेंतूनच उत्पन्न झाली आहे. 'तानिम्ना शोभन्ते गलितविभवाश्चार्थिषु नृपाः' ही इतरांस विक्षिप्त वाटणारी मनोधारणा आमच्यांतच उत्पन्न होऊं शकली. हरिश्चंद्राची व शिबिराजाची कथा आमच्या त्यागकल्पनेचें जिवंत स्मारक होत. अतिथिपूजनाचें अलौकिक दृश्य आमच्याच समाजानें उत्पन्न केलें आहे. आतिथि कसाही असो व त्याची मागणी कोणचीहि असो ती पुरी केलीच पाहिजे,कारण त्यांत माणसाचा विकासच आहे ही निष्ठा आमच्यांत या त्याग कल्पनेनेंच निर्माण केली आहे. निःसंगता हें आमच्या त्यागाचें इंगित असल्यामुळें आमच्या मानवास दुसऱ्याच्या राज्याचा व सम्पत्तीचा अभिलाष धरणें स्वभावतःच अशक्य आहे. त्यानें साम्राज्यें कमविलीं आहेत. पण तीं आपलें तेज कायम राखण्याकरितां कमविलीं आहेत, अपहरण करण्याकरितां नव्हेत. त्यानें उद्योग व व्यापार यांच्याद्वारें गजान्त लक्ष्मी संपादन केली आहे, परंतु ती दुनियेचें दैन्य हरण करण्याकरता संपादन केली आहे, संचय करण्याकरतां नव्हे. म्हणूनच आमचा मानव कधींच भोगी बनला नाही. त्यामुळेंच तो इतर मानवापासून ठळकपणें उमटून पडला आहे.

जगाच्या इतिहासांत इतका असामान्य मानव कोणच्या समाजानें उत्पन्न केला आहे काय ? बोला.

आतां उरलेल्या एका मुद्द्याचें विवरण करून हें प्रकरण संपवूं. आपण मागें धर्म व संस्कृति यांच्यांतला फरक पाहिलाच आहे. प्रश्न असा उत्पन्न होऊं शकतो कीं, हिंदुस्थानांत असलेल्या नाना धर्म, जाति, पंथ इत्यादिकांच्या बाबतीत हें प्रतिपादन कसें लागू पडतें ? मुसलमान, खिस्ती, ज्यू, पारशी इत्यादि समाज भिन्न अन्तर्जीवनविषयक कल्पनांचे असल्यामुळें त्यांचा अन्तर्भाव आपल्या राष्ट्रियत्वांत करतां येणार नाहीं हें म्हणणें सुगम आहे. परंतु जैन, बौद्ध, शीख, महानुभाव वगैरे धर्मांत व इतर पंथोपपंथांत तितकीच भिन्नता असल्यामुळें आमचें राष्ट्रियत्व म्हणजे केवळ वैदिकताच कीं काय अशी भ्रामक शंका एखाद्यास येण्याजोगी आहे. परंतु या शंकेचें निरसन सोपें आहे. एकाच नदीच्या पात्रांत भूमीच्या उंचसखलपणानें जशा अनेक धारा वाहूं शकतात त्याचप्रमाणें एकाच संस्कृतिसरितेंत भूमिकांच्या विभिन्नतेनें अनेक धर्म धारा नांदूं शकतात. त्या एकाच पात्राच्या दोन तीरांत असल्या पाहिजेत एवढीच एक अट आहे. ही अट सांभाळून वाटेल तेवढे धर्मभेद उत्पन्न करा, ते सारे एकाच संस्कृतीच्या ओटींत पडतील. हिंदुस्थानांत बौद्ध धर्म शिल्लक असलाच तर तो महायान पंथाच्या रूपानें राहिला आहे. हा महायानपंथ म्हणजे वैदिकधर्माचीच भिन्न आवृत्ति आहे. असा हा बौद्ध धर्म, जैन धर्म, शीख धर्म इत्यादि भारतीय धर्मांना या अन्तर्जीवनविषयक कल्पनांचीं दोन्हीही तीरें या नाहीं त्या रूपानें मान्यच आहेत. त्यांचा अन्तर्भाव इस्लामी, खिस्ती इत्यादि संस्कृतीत केव्हांही होऊं शकणार नाही. ते वैदिकधर्मास अत्यंत जवळचे असल्यामुळें त्याच्यासकट या सर्वांची एक संस्कृति बनूं शकते. संस्कृतीचेंच दुसरें नांव राष्ट्रियत्व असल्यामुळें हे आपोआपच सिद्ध होतें कीं, या साऱ्यांचें राष्ट्रियत्व एक आहे व या सर्वांचा मिळून जो मानव समाज होतो तो राष्ट्र या संज्ञेस पात्र आहे. हें राष्ट्रियत्व मागें निर्देशिलेल्या सात अंगांनीं बहिःसृष्टींत कसें अभिव्यक्त झालें आहे हें आपण पुढच्या प्रकरणांत पाहूं.

देशविचार

राष्ट्रीयत्व म्हणजे अतर्जीवन–विषयक कल्पना मनोभूमिकेवर एकाग्र होऊन मगच त्या बाह्य सृष्टींत सप्तरश्मींच्या रूपानें अभिव्यक्त होतात हें आपण मागे पाहिले आहे. भारताच्या बाबतींत हीं अभिव्यक्ति कशी झाली हें आतां आपण क्रमशः पाहूं. राष्ट्रीयत्व अगर संस्कृती यांच्याविषयींचा जाज्वल्य अभिमान असल्याशिवाय हीं सप्तांगें जोमदारपणानें व परिपूर्णतेनें बाह्यसृष्टींत अभिव्यक्त होऊंच शकणार नाहींत हें समजण्यास वाचकांस वेगळी खटपट करण्याची गरज नाहीं इतकी ती सरळ गोष्ट आहे. मनोभूमिकेच्याच दृष्टीनें पाहिलें तर राष्ट्रीयत्व ही एक भावना आहे. परंतु या भावनेची स्फूर्ती व शक्ति अंतर्जीवनविषयक कल्पनांतून फांकलेली आहे ही गोष्ट दुर्लक्षिली जाते. म्हणून त्याचा जास्त प्रपंच करुन वाचकांच्या मनांवर आम्ही हें बिंबविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, राष्ट्रीयत्वाचा झरा मनोभूमिकेच्या पलिकडे आहे. मनुष्याच्या ज्ञानशक्तींत तिचा उगम आहे. राष्ट्रीयत्व ज्ञानशक्तिरूप आहे, त्याचें सामर्थ्य इच्छाशक्तिमय आहे, व त्याचा विलास क्रियाशक्तिभरित आहे. त्याची ही पूर्ण मूर्ति लक्षांत न घेतां हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व हें दाखविण्याचा ज्या ज्या महाभागांनीं प्रयत्न केला आहे त्यांचा तो प्रयत्न अक्षरशः दिग्भ्रष्ट करणारा नसला तरी जिज्ञासु अंतःकरणास संशयकल्लोळांत लोटणाराच ठरला आहे. असो.

आतां आपण देशाचा विचार करूं. हिंदुस्थान हा हिंदूंचा आहे या ब्रीदवाक्याचा घोष आपल्या देशांत गेल्या पंधरा वीस वर्षांपासून एकसारखा ऐकूं येत आहे. यांत शंभर नंबरी सत्य आहे यांत मुळींच संशय नाहीं. परंतु या ब्रीदाचे विवरण करण्याची जी **पद्धति प्रचलित झाली** आहे ती **भाडोत्री असून घातक** आहे असें आम्हांस निश्चितपणें वाटते. इतिहासदृष्ट्या पाहिलें तर असें दिसून येते कीं, गेल्या महायुद्धानंतर अँग्लो-फ्रेंच राष्ट्रांनीं जर्मनीच्या चिरेबंदीकरितां जीं कुटील कारस्थानें रचली होतीं त्याची परिणती अनेक छोटी राष्ट्रें उत्पन्न करण्यात झालेली जगास ठाऊकच आहे. तीं राष्ट्रें उत्पन्न करित असतांना ज्या नानाविध साधनांचा त्यांनीं उपयोग केला त्यापैकीं एक असें होतें कीं, पूर्वीं राष्ट्रदृष्ट्या अस्तित्वांत नसलेल्या लोकांना चिथवून व त्यांना देशाभिमानाचीं ब्रीदें देऊन जर्मनीची गर्दन आंवळून टाकायची. **आदर्शबुद्धीनें** युरोपकडे पहाणाऱ्या आमच्या पुढाऱ्यांनींही तशींच ब्रीदें आमच्या देशांत उत्पन्न केलीं. हिंदूंचा हिंदुस्थान हें त्यापैकींच एक ब्रीद होय. या ब्रीदांतलें तत्व **निर्भेळ सत्य** असूनही केवळ **पाश्चात्य पद्धतीनेंच** त्याचा अवलम्ब केला गेल्यामुळें त्याच्यावर संकुचित-पणाचे अनेक आरोप आले आहेत. हे आरोपही कांहीं नवीन आहेत असें नाहीं. युरोपीय राजकारणांतूनच त्यांचे लमाणे येथे उतरले आहेत. इतर तात्त्विक विषयांप्रमाणेच याही विषयांत पाश्चात्य लोक फारसें पुढें गेलें नसल्यामुळें मुळांतच संकुचित असलेल्या या ब्रीदावरील आरोप सत्यगर्भ ठरतात. प्रचलित हिंदुत्वावरही हीच अपत्ति कोसळते. त्या आपत्तीचे निवारण आमच्या हिंदुत्वनिष्ठांना नीट करतां येत नाहीं याचे कारण हेंच आहें कीं, त्यांनीं आपलें ब्रीद **पाश्चात्यांच्या मुखांतून** स्वीकारलें आहे, आमच्या **परंपरित गोमुखांतून** नव्हे.

प्रारंभींच एक गोष्ट नमुद करून ठेवावीशी वाटते. ती ही कीं, प्रचलित पद्धतीनेंच ज्यांची अढळ अशी निष्ठा झाली आहे कीं हिंदुस्थान हा हिंदूचाच आहे, त्यांच्या बाबतींत आह्मांस कांहीही म्हणावयाचे नाही. ही गोष्ट केवळ भावनेची आहे व म्हणून आमच्यांत ही भावना कणशः जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत हें सत्य तिळमात्रही मलिन झालेले आम्ही पहाणार नाही असें म्हणणारा जो वर्ग आहे त्या वर्गाला आमची अशी प्रार्थना आहे कीं, " जानन्तु ते किमपि तान् प्रति नैष यत्न: ". त्यांची भावना तत्वनिष्ठ नसली तरी यथार्थ असल्यामुळें ते सन्मार्गावरच आहेत. बहुसंख्यसमाज भावनानिष्ठच असतो, या दृष्टीनें त्यांनी फारसें खोलांत न शिरलें तरी चालेल. परंतु समाजांतले जे लोक ज्ञाननिष्ठ असतात, ज्यांचें जीवन भावनेपेक्षां ज्ञानानेंच अधिक भारलेले असतें व या तत्वाची भावनिष्ठता अपुरी वाटत असल्यामुळें जे गहन विचाराचा आश्रय करूं इच्छितात त्यांच्याकरतांच मुख्यतः हा आमचा प्रयत्न आहे. आह्मांला हेंच दाखवावयाचें आंहे कीं, शास्त्रदृष्टीनेंही आमचें हें ब्रीद सत्यमय असल्यामुळें आपण जी धरसोड करीत आहांत ती परिणामी घातकच ठरल्याशिवाय रहाणार नाहीं. आधुनिक शास्त्रयुगाची झळ लागून जो तरुण वर्ग शास्त्रीयत्वाची निव्वळ बडबड करीत आहे त्याला आम्हांस लीनपणें असें बजावावयाचें आहे कीं, शास्त्राभासानें भुलून तूं हिंदुत्वाचा जो आंज त्याग करूं इच्छितोस तो इष्ट नाहीं. तुला खरेंच शास्त्र पाहिजे असल्यास, अशास्त्रीय विचारांकडे लोटला न जातां, क्षणमात्र थांबून, या राष्ट्रीयत्वाचा विचार कर. तुला त्यांत पूर्ण शास्त्रीयता आहे हें पटल्याशिवाय कधींच राहणार नाहीं.

मानवजातीनें देशाचा विचार आजपर्यंत केवळ भावनात्मकतेनेंच केला आहे. इटालियन तरुणांसमोर मॅझिनीनें दिलेले भावविवश व्याख्यान जगप्रसिद्ध आहे. पुरातन काळापासून तों आजच्या फॅसिस्ट कम्युनिस्ट युगा-

पर्यंत मानवानें देश व जीवन यांचें **भावमय एकीकरण** करुन टाकलें आहे. देशाभिमानाच्या पाठीशीं कांहीतरी जिवंत इतिहास असतो व त्या इतिहासापासून मिळणाऱ्या स्नेहानें ही अभिमानज्योति तेवत असते. **देशभावनेचें मूळ इतिहासांत** असल्यामुळें तिचें स्वरूप **औपाधिक** असते, **इतिहासानियत** असते. इतिहासाच्या ओघांत ठराविक मानवी भावना अखंड दिसत असल्या तरी त्यांचीं रूपें प्रवाहाप्रमाणें पालटत असतात. कारण भावनांचीं आलम्बनें स्थिर कधीच नसतात. तीही कालवश असतात. कारण त्यामुळें भावना जरी त्याच असल्या तरी आलम्बनभेदानें त्यांचाही **रूपभेद** होतो. देशभावनेचा विचार करीत असतां ही महत्वाची बाब नजरेआड करून चालायचें नाहीं. जी भावना काल एका विशिष्ट रूपाने होती ती भावना उद्याही त्याच विशिष्ट रूपानें राहिली पाहिजे असा आग्रह धरणें सृष्टिनियमास विरुद्ध आहे. असा विशेष आग्रह कोणास धरावयाचा असल्यास त्याला **तसाच भरपूर व अढळ आलंब** पाहिजे. असा आलम्ब नाही व भावनेचा आग्रह आहे असें चालणार नाहीं. कालस्वरूपी इतिहासास कोणाची भीडमुरवत नाहीं. भावना उदात्त आहे परंतु तिला ध्रुव आलम्ब मात्र नाही असें असलें तर तिची उदात्तता क्षणभर टिकते. पुढें तिची टवटवी निघून जाते व पुरांतल्या प्रेतराशींप्रमाणें या उदात्त भावना इतिहासाच्या ओघांत वेगानें तरंगत जातांना नजरेस पडतात.

इतिहासाला कांही निश्चित शरीर आहे किंवा नाहीं, त्या शरीरांत ठराविक पद्धातीनेंच फेरफार होतात किंवा नाहीं, फेरफार होत असल्यास त्यांच्या नियमांचे स्वरूप काय इत्यादि प्रश्न महत्वाचे असले तरी अजुनही त्यांची उत्तेरं वादाच्या धुळींत लोपलेलीं आहेत. इतिहास हें एक शास्त्र आहे असें जरी म्हटलें तरी त्याचें निश्चित स्वरूप अजून कोणालाही ठरवितां आले नाहीं. एक गोष्ट मात्र **सर्वमान्य** आहे कीं तो **क्षर** आहे.

व यामुळेंच सर्व मानवी व्यवहारांना अखेरीस मुमूर्षेचा अनुभव घ्यावा लागतो. आमच्या हिंदुत्वनिष्ठासही ही गोष्ट मान्य आहे. परंतु त्यामुळेंच त्यांची या विषयाची मीमांसा आपत्तीत पेंचली गेली आहे. काँग्रेस, कम्युनिझम् इत्यादि पंथाचे अनुयायी आम्हांला असा सतत प्रश्न विचारतात कीं, काळाप्रमाणें बदलले पाहिजे हें तुह्मांसही मान्य आहे, अस्पृश्यता, विधवावपन, जन्मजात चातुर्वर्ण्य इत्यादि गोष्टी तुमच्या राष्ट्रीय परंपरेच्या असूनही त्यांत आज पालट केला पाहिजे हें तुम्हीही जोरजोरानें प्रतिपादन करता. तर याच्यापुढें एक पाऊल टाकून आम्ही ह्मणतो कीं, शिवाजीच्या काळीं अगर तत्पूर्वी हिंदुस्थान हा हिंदूंचाच असला तरी आजच्या पालटलेल्या काळाप्रमाणें बदलून तो सर्व भारतवासीयांचा आहे असें म्हणण्यास कां कचरता ? ही पूर्वकालीन भावना आजच्या भिन्नकाळांत अट्टाहासानें धरूं पहाणें अशास्त्रीय नाही काय ? राष्ट्रीयत्व ही भावनाच असेल तर ती आलम्बाभिसारिणीच रहात असल्यामुळें, आज उपस्थित झालेले नवीन प्रश्न विचारांत घेऊन नूतन राष्ट्रीयत्व कां उत्पन्न करूं नये ? या व अशासारख्या इतर प्रश्नांच्या भडिमारानें आमचा हिंदुत्वनिष्ठ बावरून जातो. व त्यांची यथार्थ उत्तरें न देतां Battle of Blenheim या कवितेतील म्हाताऱ्याप्रमाणें 'No, it was a great victory' असेंच सारखें तापटीत बसतो आमचें म्हणणें असें आहे कीं, ही कोंडी आम्ही आमच्या अज्ञानानें उत्पन्न केली आहे. शास्त्रदीप हातीं घेऊन आम्ही जर या वादाच्या अंधःकारांत शिरलो तर आम्हांला आमचा मार्ग स्पष्टपणें दिसूं लागेल ही आमची खात्री आहे.

इतिहासांत योगायोग, आकस्मिकता इत्यादि गोष्टींचाही भरणा दिसून येतो. किंबहुना यांच्यामुळेंच इतिहासांत वैचित्र्य उत्पन्न होते. असें वैचित्र्य नसतें तर इतिहास अनाकलनीय mystical ठरला असता असें जें मार्क्सनें एका पत्रांत म्हटलें आहे तें खरें आहे. जगांतलीं पुष्कळशी

मोठमोठीं माणसें अशी आढळून येतात कीं, ती एका देशांत जन्मलेली असतात, दुसऱ्या देशांत वाढलेली असतात, व तिसऱ्याच देशाला आपल्या कर्तृत्वाच्या बळावर नामांकित करतात. 'देवकी उदरीं जन्मला। यशोदागृहीं वाढला। शेखीं उपेगा आला। पांडवासी॥' हा योगायोग पुरातन कालापासून आजपर्यंत घडत आला आहे. भौतिक सुखसाधनांच्या अत्यंत समृद्धतेच्या आजच्या काळांत हे योगायोग तर विपुल आढळतात. उदा. नोबेल प्राईझ मिळविणाऱ्या अमेरिकेच्या Pearl Buck ला चीन देशाचा ध्यास लागलेला दिसून येतो. ही स्थिति जवळजवळ साऱ्या मानवी व्यवहारांत आज पहावयास सांपडते. त्यावरून ही गोष्ट लक्षांत येईल कीं, देशाभिमान व तज्जन्य 'हिंदुस्थान हा हिन्दूंचाच' असलीं ब्रीदें भावनामूलक असल्यामुळें आजचे मोठमोठे तात्विक प्रश्न या भावनेनुसारच सोडविण्याचा हट्ट धरणें अशास्त्रीय होईल. शास्त्रांत भावनांना कांहीं मानच नसतो असें नाही. परंतु त्यांना सर्वंकष मान कधींच नसतो हेंही विसरून चालतां येणार नाहीं. 'पुष्पाभावे अक्षतान् समर्पयामि' अशा तऱ्हेचाच त्यांचा मान असतो. बुद्धिमान माणसाचें समाधान अशा भावनांनीं होणें शक्य नसल्यामुळें, शास्त्राचा आभास कां असेना, पण तो उत्पन्न करणाऱ्या पक्षाकडे आमच्या तरुणांची वृत्ति सहज ओढ घेते. यांत त्यांनाच कांहीं सर्वस्वी दोष लावतां येणार नाही.

प्रचलित देशाभिमानाच्या भावनेला आजची इतिहासदृष्टि जशी खंबीर पायावर उभी करूं शकत नाही त्याचप्रमाणें ती जगभर पसरलेल्या कांहीं **मिथ्याग्रहांनाही** समर्थित करूं शकत नाही. आजची इतिहासदृष्टि **दुधखुळी व बिबुनडी** असल्याचा हा परिणाम आहे. आर्यलोक हिंदुस्थानांत बाहेरून कोठून तरी आले हा जो **मिथ्याग्रह** सर्व जगभर पसरविला गेला आहे त्याचें समर्थन करण्याचीही बलिष्ठता या इतिहासांत नाही. हिन्दुस्थान हा हिंदूचाच आहे हें सिद्ध करणारा पक्ष या प्रश्नाला जसें महत्व

देतो तसेंच तें ब्रीद अमान्य करणारा प्रतिपक्षीही देतो म्हणून या प्रश्नाचा आपणांस संक्षेपतः विचार केला पाहिजे. या प्रश्नाचें महत्व आपणांस दोन दृष्टीनें आहे. आर्यलोक हिन्दुस्थानांत बाहेरून कोठून तरी आले हें असत्य जगाच्या वाङ्मयांत कांहीही पुरावा नसतांना आम्ही मुकाट्यानें पचवून घ्यावें हें मनास बरें वाटत नसल्यामुळें या विषयाचें दिग्दर्शन करणें आवश्यक आहे. इतिहासदृष्ट्या या प्रश्नाचें जसें महत्व आहे तसे तें सांस्कृतिक दृष्ट्याही आम्हांस आहे. आमच्या आधुनिक संशोधकांस न पटणारी गोष्ट प्राचीन आर्यांनी बाह्यांपासून उसनी घेतली असें सर्रास मानण्याची जी खोड त्यानें आम्हांस लावून दिली आहे त्यामुळें आमचें सांस्कृतिक शिल्प अधिकाधिक ढांसळून पडत आहे. याचें बीजही वर उल्लेखिलेल्या मिथ्या ग्रहांतच आहे. आणि म्हणूनच आज उपलब्ध असलेले वाङ्मय काय दर्शवितें हें पाहिल्याशिवाय पुढें पाऊल टाकणें अशक्य व अनिष्ट आहे.

संस्कृत भाषेचा प्रवेश युरोपांत झाल्यापासून तेथील विद्वानांनीं आमच्या वाङ्मयाचा करून अभ्यास चालू केला आहे. मॅक्स मुल्लरनें या अभ्यासास पुष्कळशी गति दिली होती. भाषाशास्त्र व पुराणकथाशास्त्र यांचा तौलनिक अभ्यास करून त्यानें आपल्या कांहीं कल्पना बसविल्या होत्या. अभ्यास करीत असतांना त्याला असें आढळून आलें कीं, भारतांतली संस्कृति व कांहीं यूरोपीय व इतर राष्ट्रांची संस्कृति यांत बऱ्याच महत्त्वाच्या बाबतींत आश्चर्यकारक साम्य आहे. या साम्यांवरून त्यानें असे अनुमान काढलें कीं, हीं साम्यें बाळगणारे समाज एकाच वंशाचे असले पाहिजेत व ते एका मूलगृहांतून जगभर पसरले असले पाहिजेत. त्याच्या पूर्वीच्या यूरोपीय पंडितांनी अशाच कल्पना मांडल्या असल्या तरी मॅक्स मुल्लरच्या प्रथितत्वामुळें इण्डोयुरोपीअन मूलगृहाची व आर्यांच्या आक्रमणांची कल्पना दृढमूल होऊन बसल्यासारखी झाली आहे. स्वतःच्या संस्कृतिश्रेष्ठत्वाची घमेंड असलेल्या पाश्चात्य

पंडितांनी या सिद्धांतांना उचलून धरून इतिहासांत त्यांना अढळ केलें आहे यांत मोठेसें नवल नाहीं. पददलित हिंदुस्थानला शक्य तितका काळ आपल्या ताब्यांत ठेवणें जेत्यांना इष्ट असल्यामुळें त्यांच्या पण्डितांनीं अशी हेतुपुरस्पर मोहिम उठवावी यांत अनपेक्षित असें कांहींच नाही. **अनपेक्षित हें आहे** कीं स्वातंत्र्याची घोषणा करणाऱ्या आमच्या पुढाऱ्यांनी जेत्यांच्या पण्डितांची संशोधनशास्त्रातली ही **रोहिलेशाही मुकाट्यानें सहन करावी** व त्यांनीं ठरविलेले सिद्धांत **स्वयंसिद्ध सत्यप्रमाणें** (axioms) मानून घ्यावेत. यापरती **स्वाभिमानशून्यता** ती कोणती असणार?

भारतीय विद्वानांच्या लक्षांत **आपल्या इतिहासाच्या संशोधनाचे शास्त्र आपणच बसविले पाहिजे** हें अजूनपर्यंत आलें नसल्यामुळें आमचा इतिहास आतांपावेतो विकृतच राहिला आहे. यूरोपीय पण्डितांच्या या **घमेंडखोरीच्या** सोबतीला त्यांची **परात्मप्रवेशाची** अपात्रताही येऊन बसली आहे आणि त्यामुळें त्यांनीं मनुष्यस्वभावालाही विरुद्ध असलेले **तर्कांचे अचाट तारे** तोडून आमचा इतिहास **विरूप** करून ठेवला आहे. आमच्या पण्डितांच्या लक्षांत हीही गोष्ट आली नाही. पाश्चात्य पाण्डितांनी संशोधनाचे जे नियम बसविले ते नियम शास्त्रनिकषावर घासून न पहातांच आमच्याही लोकांनी ग्रहण केले आहेत. पाश्चात्यापेक्षांही आमच्या पंडीतांनीं आमचा इतिहास **अतिशय विच्छिन्न** करून टाकला आहे. स्वतःची ओळख विसरून गेलेल्या लोकांनींच संस्कृतीचे अतिशय नुकसान केलेलें असते हें सत्य याही बाबतींत प्रत्ययास येत आहे.

मॅक्स मुल्लरची मतें शेवटीशेवटी बरीचशीं पालटलीं होती. परंतु त्याच्या पूर्वीच्या मतांचीच आमच्या विद्वानांनीं तळी उचलली. १८८८ सालीं मूलगृहासंबधी त्यानें "......... the evidence is so pliant that it is possible to make out a more or less plausible case" for almost any part of the world'. (Page 99, History of

Anthropology—Dr. A. C. Haddon) अशी जी कबूली दिली आहे तिकडे कोणीच लक्ष पुरवित नाहीं. कीथसारखा विद्वानही 'Reminiscences of an older non-Indian home may be safely regarded as purely speculation.' हें उघड उघड सांगतो तेंही कोणी लक्षांत घेत नाही. स्वतः लोकमान्यही कबूल करतातच कीं, आर्यांच्या भारताबाहेरील मूलगृहाची सिद्धि करण्याकरतां ऋग्वेदांत प्रत्यक्ष पुरावा नाही. असें असूनही आमची अशी निश्चित समजूत करून देण्यांत आली आहे कीं, आर्य लोक बाहेरूनच येथें आले हें सर्वमान्य तत्व आहे. उदा. श्री. चिं. वि. वैद्यांचा 'The Indian Historica Quarterly' (June 1929) मधील लेख पहा. ते आर्यांच्या आक्रमणास 'an unquestionable historical fact' "established theory' इ. रीतीनें गारांवतात. आर्य नांवाचा वंश अस्तित्वांत होता किंवा नाही हाच मुळीं असिद्ध प्रश्न आहे. इतर बाबतींप्रमाणें मॅक्स मुल्लरनें याही बाबतींत आपल्या उत्तरायुष्यांत अशी मान्यता दिली आहे कीं, मी ज्या ज्या वेळीं आर्य असें म्हणतो त्या त्या वेळेला माझ्या समोर वंश नसून भाषा असते. भाषेवरून वंशाची कल्पना करणें चूक आहे असेंही तो म्हणतो (It is worse than a Babilonion confusion of tongues--it is downright theft--The phonolcgist should collect his evidence arrange his class, divide and combine...His evidence is the evidence of language and nothing else...There to be no compromise between ethnological and phonological science." page 99 History of Anthropology.) डॉ. केतकरांनींही आर्य व अनार्य हीं वंशवाचक नांवें नाहींत हें चांगलें दाखविलें आहे. आर्य हें नांव वंशवाचक नाहीं हें आतां सर्वमान्य झालें आहे. मुळांत अशी स्थिति असूनही आमचें विद्यालतें आम्हांस जणुं हा आर्यांच्या आक्रमणाचा सिद्धांत अढळपणें प्रस्थापित झाला आहे असेंच शिकवीत आहे!

हा सिद्धांत प्रस्थापित करण्याकरितां भाषाशास्त्र, पुराणकथाशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र, वंशशास्त्र, भूस्तरशास्त्र इत्यादिकांचा आधार वेळोवेळीं घेण्यांत येतो. परंतु हीं शास्त्रें अजूनही अप्रतिष्ठित आहेत. त्यांच्या सिद्धांतांना पदार्थविज्ञान किंवा रसायनशास्त्र यांच्याप्रमाणें स्थिर पाया लाभला नाहीं. या शास्त्रांतल्या नियम म्हणवल्या गेलेल्या कल्पना अजूनही हवेतले तरंगच आहेत. म्हणूनच या शास्त्रांवर पूर्णपणें भिस्त ठेवतां येत नाहीं हें कांहीं विद्वानांनीं चांगले दाखविलें आहे. बरें, जो कांहीं वाङ्मयीन पुरावा मिळतो तोही इतका अपुरा आहे कीं त्यावरून ही आक्रमणाची कल्पना सर्वथा बिनबुडीच ठरते. पाश्चात्य पण्डितांनीं आपला ग्रह शास्त्रीय करण्यासाठीं जगांत सर्वांत जूना असलेला ऋग्वेद मदतीस घेतला व त्याचा अन्तर्गत पुरावा आपल्या म्हणण्यास साधकच आहे असें दाखविण्याचा त्यांनीं खटाटोपही केला. ज्या दाशराज्ञ युद्धावरून आक्रमणाची कल्पना करण्यांत आली आहे तें, हजार सूक्ताच्या ऋग्वेदांत, फक्त तीनच सूक्तें व्यापणारें आहे व या तीन सूक्तांवरून देखील आक्रमण सिद्ध होतेंच असें नाहीं असें हे पण्डितच कबूल करतात. भारतीयांना परिचित असलेल्या अश्वमेध यज्ञाचे व तदंगभूत दिग्विजयाचे वर्णन या तीन सूक्तांत आहे. खुद्द ऋग्वेदांतच आर्यांची या भूमीसंबंधीची जी उत्कट भावना व जो जिव्हाळा प्रकट झाला आहे तो कोणत्याही भटक्या लोकांत आढळून येणें अशक्य आहे. श्री. अविनाशचंद्र दास यांनी ही गोष्ट फार उत्तम-रीतीनें दाखविली आहे. (Rgvedic India.)

भारतीयांचें जें इतर वाङ्मय आहे त्यांत तर या आक्रमणाच्या कल्पनेच्या विरुद्ध हवा तेवढा पुरावा आहे व त्यावरून ही कल्पना सर्वथैव मिथ्या आहे असेंच कोणाही प्रामाणिक अभ्यासूस वाटेल. पुराणांचा प्रसिद्ध अभ्यासक पारगीटर यानें तर असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, वायव्येकडच्या आक्रमणाची कल्पना 'improbable in itself' असून 'wholly unnecessary

according to the tradition ' अशी आहे. प्रो. म्यूरचेंही असेंच म्हणणें आहे. शूद्र लोक मूळचे रहिवासी असून आर्यांनीं त्यांना आपले दास बनविले अशी आमच्या संस्कृतीस काळिमा लावणारी अपमानास्पद कल्पना जी पाश्चात्य पण्डितांनीं पसरविली आहे ती निर्मूल आहे असें सांगतांना स्वामी विवेकानंदांनीं जे खडे बोल काढले आहेत ते अत्यंत हृदयंगम असल्यामुळें आम्हांला ते उध्दृत करण्याचा अनावर मोह होतो. स्वामीजी म्हणतात ' It is the idea that they are the aborigines because there is a parallel to this in modern history. The Americans, the English and so on got hold of the poor Africans and they with their children of mixed birth made slaves. So from this the mind of the ethnologists jumps back to several thousand years and concludes that the same must have happened in India. He declares that India was full of dark-eyed aborigines before and the fair Aryans came from the Lord knows where. For according to some of them they came from Central Tibet, while others will have it that they came from Central Asia. There are patriotic English-men who think that Aryans were all red haired. Again if the writer happens to be a black-haired man, he thinks that the Aryans were all black. Of late, an attempt was made to prove that the Aryans lived on the Swiss lakes. Some say now that they lived at the North Pole even. But there is *not one word* in our scriptures, *not one*, to prove that the Aryans ever came from anywhere outside of India, of ancient India which included Afghanistan within it. The theory that the Shoodra caste is all non-Aryan is equally illogical and equally irrational. (Indian Lectures of Swami Vivekananda).

आमचे ग्रंथ व आमची परंपरा असें ढळढळीतपणें दाखवितें कीं, भारतीयांनीं भारताबाहेर मोठमोठीं साम्राज्यें गाजविली आहेत. हीं

साम्राज्यें गाजविण्याकरतां बाहेर पडलेले भारतीय लोक कालांतरानें संस्कृतिहीन झाले व त्यांच्यापासूनच जगांतील इतर संस्कृति उत्पन्न झाल्या ही गोष्ट आमच्या वाङ्मयांत अनेक ठिकाणीं नमूद केली गेली आहे. यूरोपीय अभ्यासकास दिसणारीं साम्यें वस्तुतः या परिस्थितीमुळेंच उत्पन्न झालीं आहेत असें म्हणण्यांत कोणताही प्रत्यवाय नाहीं. मेक्सिकोपासून तों आस्ट्रेलियापर्यंत दिसून येणारीं साम्यें परस्परांपेक्षां भारतीय संस्कृतीशीच अधिक जुळतात. इतक्या सर्व ठिकाणापासून भारतीयांनीं उसनवारी करून आपली संस्कृति बनविली असें म्हणण्यापेक्षां भारतीय साम्राज्यामुळेंच ही साम्यें अस्तित्वांत आली असें म्हणणें जास्त सशास्त्र नाही काय? भारतवर्ष एवढें उन्नत होतें ही कल्पनाही ज्या पाश्चात्यांना सहन होत नाही त्यांनीं हें सयुक्तिक अनुमान मान्य करण्यास तयार न होणें स्वाभाविक आहे. परंतु आमच्या लोकांनींही हीच तयारी दाखविणें, स्वाभिमानाचें द्योतक आहे काय? ऋग्वेदापासूनचें सारें वाङ्मय, भारतवर्ष हेंच मूलगृह आहे, असेंच जर दाखवितें व भारतीयांची उज्ज्वल परंपराही हाच उत्तुंग निनाद काढते तर एवढा मोठा प्रत्यक्ष पुरावा बाजूला सारून आक्रमणाच्या कल्पनेस बळी कां पडावें? या कल्पनेलाच मूठमाती कां देऊ नये?

पाश्चात्य पण्डितांच्या तालावर नाचून आमच्या लोकांनींही द्रविडीयन संस्कृतीचे भूत उभे केलें आहे. तसें करण्यास कांहींच पुरावा नाही. उलट त्या बाबतींत अज्ञानाचा अवलंब केलेला बरा असें कीथसारखे तज्ञ कबूल करतात. परंतु आमच्या संशोधकांच्या बुद्धीचें अकुंठित वारूं ही गोष्ट लक्षांत घेऊन विचार करण्यास थांबतेच कशाला? द्रविडीयन म्हणून कोणी वेगळे लोक होते असें मानण्यास वस्तुतः कांहींच पुरावा नाही. भाषा व वंश यांची भिन्नता असली म्हणजे संस्कृतीचीही भिन्नता असतेच असें नाही. उलट भारतीय परंपरेनुसार

मनूनें म्हटल्याप्रमाणें द्रवीड लोक संस्कृतिविमुख झालेले भारतीयच ठरतात. पारशी संस्कृति व आमची संस्कृति यांच्या संबंधाच्या बाबतींतही संशोधकांनीं अवन्वितपणा प्रकट केला आहे. हिमप्रलयासारख्या आपत्तींची स्मृति समाजांत कायम रहाणें स्वाभाविक आहे. ही स्मृति पारशांच्या ग्रंथांत स्पष्टपणें दिसून पडते आणि ऋग्वेदांत मात्र त्याचा कांहींच मागमूस लागत नाहीं ही गोष्ट कांहीं कमी उद्बोधक नाहीं. यावरूनही हें ठरावयास पाहिजे कीं, ऋग्वेदी संस्कृति या संस्कृतीच्या पूर्वीची असून त्या संस्कृतीच्या आयुष्यांत हिमप्रलयामुळें मूलगृह नष्ट झाल्याचा प्रसंग उद्भवलाच नसावा. जगांतल्या आयरिश, स्वीडीश, ट्युटॉनिक जर्मन इ. आर्य लोकांना आपण बाहेरून कोठून तरी आलो ही स्मृति असावी, हिब्रु, सुमेरिअन लोकांसारख्या अनार्यांसही तत्सम जाणीव असावी आणि ऋग्वेदी भारतीय मात्र हा एवढा मोठा प्रसंग विसरून जाऊन अगदी विपरीत भावना बाळगणारे बनावे ही गोष्ट आपाततः ही न पटण्यासारखी आहे. श्री. जयनाथ पति यांनीं आपल्या लेखांत (The Indian Historical Quarterly Vol. 4. No 4 Dec. 1928--Page 679) "Have you ever found cultured foreigners forgetting their old homes and becoming enamoured of their newly made conquest?" असा जो प्रश्न डॉ. चटर्जींस विचारला आहे तो मार्मिक आहे. इतर लोक पूर्वघटनांची स्मृति बाळगतात व आर्य लोक बाळगत नाहींत याचा एकच अर्थ संभवू शकतो. एक तर ऋग्वेदी भारतीय हे ही स्मृतिही न बाळगता येण्याइतके मध्यंतरी रानटी बनले असले पाहिजेत अगर ते मूळचेच तिथले असले पाहिजेत. संशोधक यापैकीं कोणती गोष्ट मानावयास तयार आहेत? आम्हांस असें वाटते कीं, दुसरा विकल्प मानणेंच अधिक सयुक्तिक आहे. ऋग्वेदी भारतीय एवढे रानटी झाल्याचे इतिहास मुळींच दाखवीत नाहीं.

या विषयाबाबत एकंदर स्थिती अशी आहे. दिग्दर्शन होण्यापुरतेंच आम्ही येथें आमच्या अधिकारास अनुसरून विवेचन केलें आहे. या विषयांची अनेक अंगोपांगें आहेत. त्या विषयांचा विचार एवढ्यांत करतां येण्यासारखा नाहीं व तसें करण्याची आमची पात्रताही नाहीं. त्याचा सम्पूर्ण व सप्रमाण विचार सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय विद्वान् श्री. अप्रबुद्ध यांच्या 'ऋग्वेदाचा संदेश' या बहुमोल ग्रंथांत आढळून येईल. आम्हांला येथें एवढेंच दाखवायचें आहे कीं, या विषयांत 'Putting dogma in the place of scientific enquiry' (E. A. Thomas ची Max Muller वरील टीका) असेंच फार झालें आहे. शास्त्रसंशोधकांचें हें मुख्य तत्व असावयास पाहिजे कीं, कमींतकमी गृहीतकृत्यांच्या सहाय्यानें जास्तीत ज़ास्त घटनांचे अर्थ सुसंगततेनें सुबोध झाले पाहिजेत. ऋग्वेदाचा व इतर भारतीय वाङ्मयाचा अभ्यास करतांना संशोधकांनीं ही गोष्ट जवळजवळ लक्षांत घेतलीच नाही असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पाश्चात्य पण्डितांनीं व त्यांच्या भारतीय मानसपुत्रांनीं अशा कितीतरी गोष्टी गृहीत धरल्या आहेत कीं, ज्यामुळें कोणालाही हव्या तितक्या गोष्टी गृहीत धरून हवे ते सिद्धांत काढतां येतील अशी अनवस्था उत्पन्न झाली आहे. ऋग्वेदी भारतीय रानटी होते, त्यावेळी चातुर्वर्ण्य नव्हते, अमुक ऋचा अगर मंडळ नवें व अमुक जुनें इत्यादि गोष्टी निव्वळ गृहीतच धरल्या आहेत. अभावाच्या पुराव्यास अमर्याद महत्व दिलें आहे. ऋग्वेदाच्या बाबतींत संशोधकांनीं जो आचरटपणा केला आहे त्याचें यथार्थ स्वरूप विदारकतेनें श्री. दास, श्री. अप्रबुद्ध इ. विद्वानांनीं प्रकट केले आहे, तें मननीय आहे. अनेक महत्वाच्या गोष्टींचा ज्योतिषशास्त्र दृष्ट्याच उलगडा करावयचा ही अजब खोड आमच्या संशोधकांना जडली आहे. तसें करीत असतांना त्यांनीं मनुष्य स्वभावाचाही फारसा विचार केला नाही. लो. टिळकांसारख्या प्रज्ञावंतांचीही या बाबतींत फसगत व्हावी ही मोठी खेदाची

गोष्ट आहे. आपला सिद्धांत मांडण्याकरतां त्यांना जी शद्बांची ओढाताण व कसरत करावी लागली ती पाहून मनास उद्वेग वाटल्याविना रहात नाहीं. एखाद्या भौतिक परिस्थितींत एखादा समाज प्रारंभापासूनच नांदत असला तर त्याला तिची भीति वाटत नाहीं हा अखिल मानवजातीचा सामान्य अनुभव आहे. ऋग्वेदी आर्य ज्या अर्थी उत्तरध्रुवाच्या रात्रींना भीत असत त्या अर्थी ते तिथचे मूळचे नसावेत हाच सिद्धांत लोकमान्यांनीं मांडावयास हवा होता. उलट त्यांनीं वर्णन केलेल्या ध्रुवप्रदेशाच्या ज्योतिर्विषयक वर्णनावरून असें दिसतें कीं, तेथील रात्रीं एवढ्या भीतिप्रद नसतातच मुळी. ही विसंगति शास्त्रीय म्हणावी काय ?

श्री. दास यांनीं लोकमान्यांचें खंडण करून आपला सिद्धांत मांडण्याचा कसून प्रयत्न केला आहे. परंतु त्यांनीं भूस्तरशास्त्रावर अतिशय भरंवसा ठेवल्यामुळें त्यांच्याही प्रतिपादनांत कांहींसा घोंटाळा उत्पन्न झाला आहे. हें शास्त्र अजूनही अप्रतिष्ठच आहे ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्यांनी त्याच्या बळावर ऋग्वेदकालीन भौतिक परिस्थिती आंखण्याचा जो प्रयत्न केला आहे तो एकांगी कसा आहे हें चांगलें लक्षांत येईल. लोकमान्यांच्या प्रतिपादनांत अव्यवस्थितपणा झाला असला तरी त्यांत कांहीं व्यवस्थितपणाही आहे, तो नजरेआड करून चालणार नाहीं. त्याला पुराव्याचें स्वरूप येण्याइतकें महत्व खास आहे. श्री. दास यांनी भूस्तरशास्त्राच्या आधारानें ऋग्वेदी भारतीयांचा सारा प्रपंच अतिशय चिंचोळ्या प्रदेशांत कोंबला आहे. लोकमान्यांप्रमाणेंच त्यांनींही कांहीं बाबतींत अतिरेक केला आहे. या दोन्ही विद्वानांचे अतिरेक टाकून दिले तर ऋग्वेदकालीन भौगोलिक स्थितीचा आपणांस योग्य तो उमज पडूं शकतो. खुद्द ऋग्वेदच भूमीची अफाट कल्पना देत आहे. लोकमान्यांचा उत्तरध्रुवाचा पुरावा लक्षांत घेतला तर असें म्हणणें भाग आहे कीं, ऋग्वेदी आर्यांचें साम्राज्य उत्तरध्रुवापर्यंत पसरलें होतें. हिमप्रलयामुळें

तेथल्या वसाहती भारताकडे परतल्या. इतिहासकार म्हणतात त्याप्रमाणें आर्यांचें आक्रमण म्हणून कांहीं गोष्ट घडलीच असेल तर ती एवढ्याचपुरती असली पाहिजे. वसाहतीच्या लोकांमुळें मूलगृहांतील लोकांवर फारशी मोठी छाप पडत नसल्यामुळें ऋग्वेदांत उत्तरध्रुवस्थितीची स्मृतिच केवळ आढळत असावी. श्री. दास यांच्या विचारसरणींत ही गोष्ट लक्षांत घेत-लेली दिसत नाहीं. त्यांच्या विचारसरणींत दुसराही एक दोष दिसून येतो. ऋग्वेदकालापासून आमची संस्कृति ही एका विशेष अवस्थेंत आहे—ज्या अवस्थेला श्री. अप्रबुद्धांनीं निर्गतावस्था (deductive) असें म्हटलें आहे—ती अवस्था इतिहासदृष्ट्या महत्वाची असूनही त्यांच्या विचारसरणींत आढळून येत नाहीं. थोडक्यांत या विषयाचें स्वरूप असें आहे. तो अजून विवाद्य असल्यामुळें अस्तिनास्ति कोणत्याही पक्षाला याचा आश्रय घेतां येणें कठीण आहे.

मग हिंदुस्थान हा हिंदुंचाच हें सत्य सिद्ध कसें होतें असा प्रश्न वाचक विचारतील. आमचें त्याबाबत असें म्हणणें आहे कीं, इतर सर्व गोष्टींप्रमाणेंच याही बाबतींत भारतीयांनी आपली शास्त्रनिष्ठाच दाखविली आहे. ती जर आपण लक्षांत घेतली तर आपल्याला हें कोडें सहज उल-गडेल. आजचे इतिहासज्ञ समजतात त्याप्रमाणें आपण असेंच धरून चालूं कीं, आर्यलोक बाहेरूनच हिंदुस्थानांत आले व इथच्या परिस्थितीशीं मेळ घालून त्यांनीं एक वेगळीच संस्कृति उत्पन्न केली, हिंदुसंस्कृति ही अशा भेसळींतून निर्माण झाली व भारताचा पुढचा सारा इतिहास या भेसळ संस्कृतीचाच इतिहास होय. यावर आमचें असें म्हणणें आहे कीं, या भेसळ संस्कृतीप्रमाणेंही हिंदूंचा हिंदुस्थान हें ब्रीद शास्त्रीय सत्य ठरते.

आमच्या पूर्वजांनीं ज्या भेसळ संस्कृतीचा प्रपंच हिंदुस्थानांत थाटला त्या भेसळ संस्कृतीचें सारें वाङ्मय पाहिलें तर त्यांत या देशाविषयींची अखंड अशी धारणा उत्कटतेनें दिसून येतें. 'दुर्लभं भारते जन्म मानुष्यं

तत्र दुर्लभम्' हीच ती धारणा होय. ब्रम्हदेवानें वेदाच्याही अगोदर पुराणें निर्माण केली अशी ज्या पुराणांची महती सांगण्यांत येते, ती पुराणें हाच घोष अव्याहत काढीत आहेत. पुराणांनीं अत्यंत प्राचीन व अतिशय महत्वाच्या परंपरा कायम राखण्याचें महत्वाचें काम केलें आहे हें इतिहासज्ञ कबूल करतातच. प्रो. रॅप्सन म्हणतो कीं, 'We cannot escape from the only possible conclusion that the Puranas have preserved in however perverted and distorted a form, an independant tradition which supplements the priestly traditions of the Vedas and Brahmanas and which goes back to the same period.' (Cambridge History of India. Vol. 1, P. 302.) पारगीटर वगैरेंचेही असेंच मत आहे.

विष्णुपुराण तर स्पष्टच म्हणतें कीं,

अत्रापि भारतं श्रेष्ठं जम्बुद्वीपे महामुने ।
यतो हि कर्मभूरेषा ततोऽन्या भोगभूमय: ॥ २२ ॥
अत्र जन्मसहस्राणां सहस्रैरपि सत्तम ।
कदाचिल्लभते जन्तुर्मानुष्यं पुण्यसंचयम् ॥ २३ ॥
गायन्ति देवा: किल गीतकानि
धन्यास्तु ये भारतभूमिभागे ।
स्वर्गापवर्गस्य च हेतुभूते
भवन्ति भूय: पुरुषा: सुरत्वात् ॥ २४ ॥

—(द्वितीयांश–तृतीय अध्याय)

भागवतांतही असेंच वर्णन आलें आहे. वैदिक परंपरा टिकवून धरणाऱ्या पुराणांपासून तों आजकालच्या विवेकानन्द व अरविन्द यांच्यासारख्या महात्म्यांपर्यंत या धारणेची धारा संतत आहे. जगांतल्या प्रत्येक गोष्टीचा शास्त्रदृष्टीनें विचार करण्याचा बाणा असलेल्या आमच्या लोकांनीं या बाबीकडे निव्वळ भावनावशतेनें पाहिलें असेल असें म्हणवत नाहीं. मार्गें

दिलेल्या अंतर्जीवनविषयक कल्पना लक्षांत घेऊन आपणाला निश्चितपणें असें म्हणतां येते कीं, आमचा हा आग्रह शास्त्रीय आहे. आमचें सांस्कृतिक जीवन या आग्रहाशीं अगदीं निगडित आहे. जगावयाचेच असलें तर आम्हांला हा आग्रह धरणें भाग आहे.

मागें आपण पाहिलेंच आहे कीं, आमच्या राष्ट्रीयत्वानें कर्माचें जसें एक भरीव शास्त्र निर्माण केलें आहे तसें जगांतल्या कोणत्याही समाजानें निर्माण केलें नाहीं. त्या शास्त्रानुसारच भूमीचा विचार होऊन कर्मभूमि व भोगभूमि असा विभाग आमच्या लोकांनीं केला आहे. भारतीय मनुष्य कर्म कशाला म्हणतो याची जर नीट कल्पना आली तर हा भेद समजण्यास सुलभ जातें. जगाचें स्वरूप ऊर्ध्वमूल व अधःशाख आहे ही भारतीय कल्पना लक्षांत घ्या व मग या कर्मभूमीचा अर्थ उलगडतो कीं नाही तें पहा. आपणांस दिसणारी सृष्टि शाखारूप असून तिचें मूळ सामान्यतः अदृश्य आहे; म्हणून या सृष्टीस टवटवी आणावयाची असेल तर सिंचन मूलगामीच झालें पाहिजे हें उघड आहे. या सिद्धांताचाच प्रतिसिद्धांत असा कीं, हें सिंचनकर्म करण्याकरतां योग्य ती भूमीच आवश्यक आहे. शास्त्रदृष्टि असणाऱ्या आमच्या पूर्वजांना प्रयत्नांतीं असा अनुभव आला आहे कीं, ही भूमि भारतवर्षंच राहूं शकते. पृथ्वी थंड होतांना तिचे रसायनदृष्ट्या भेद पडतात ते जितके स्वाभाविक आहेत, निसर्ग-नियमांनीं बद्ध आहेत, तितकाच आमच्या कर्मशास्त्रानें केलेला भूमिभेद स्वाभाविक आणि निसर्गनियमांस धरून आहे. पाण्याचा अमुक एक झरा अमुक एका भूमीतूनच कां उफाळावा हें जसें कोणाच्याही मर्जीवर अवलम्बून नाहीं, त्याप्रमाणेंच वरील भूमिभागही कोणाच्या इच्छेअनिच्छेवर अवलम्बून नाहीत. तो निसर्ग आहे. त्याला आमचा नाइलाज आहे. स्वामी विवेकानंदांनीं एका ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'If there is any land on this earth that can claim to be the blessed Punyabhumi, to the land

which all souls on this earth must come to account for कर्म, the land to which every soul that is wending its way Godward, must come to attain its last home, the land where Humanity has attained its highest towards gentleness, towards generosity, towards purity, towards calmness, above all the land of introspection and of spirituality, it is India.'—(Collected works PP. 550)
स्वामीजींचें हें दिव्य उद्गार शास्त्रीयतेचे निदर्शकच आहेत.

बॅ. सावरकरांनीं आपल्या हिंदूच्या व्याख्येंत जो 'पूण्यभूः' शद्ब वापरला आहे त्याला कांहीं अर्थ असावयास पाहिजे असेल तर तो आम्ही म्हणतो त्याप्रमाणेंच अरूं शकतो. आमचा अर्थ जरी त्यांना अभिप्रेत नसला तरी आमचें शास्त्र हाच अर्थ सांगतें. आमच्या कर्मतत्वाप्रमाणें स्वतंत्र कर्तृत्व असलेला मनुष्यजीव भारतवर्षांत कर्म करूनच स्वतःचा व जगाचा विकास घडवूं शकतो हाच पुराणांतील 'कर्मभूः' शद्बाचा अर्थ आहे. कर्मभूः म्हणजेच पूण्यभूः. 'पितृभूः' हा भावनेचा भाग तर 'पूण्यभूः' हा शास्त्रीय भाग आहे. या भूमींत राहून आम्ही जें कर्म करतो त्याचें रसमय फळ इतर भूमींना अनायासें प्राप्त होतें म्हणून त्या भोगभूमी होत. परंतु आमच्या कर्माचें फल आम्हांला निसर्गनियमाप्रमाणें येथेंच भोगावयास मिळतें. म्हणजे आम्ही जीं सांस्कृतिक कर्में करतो तीं आम्हांला इथेंच केलीं पाहिजेत व त्यांची फळेंही आम्हाला इथेंच भोगलीं पाहिजेत. आमचें सम्पूर्ण राष्ट्र दुसऱ्या भूमींत जरी नांदूं शकले तरी आमची स्थिति 'यथासांग रे कर्म तेंही घडेना। घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना ॥' अशी विकलच होईल. आम्ही आमचीं सांस्कृतिक कर्में यथाशास्त्र केलीं तरच आम्ही जिवंत राहिलो असें होईल. एरव्ही आम्ही मृत ठरूं. जगण्याचा हक्क प्रत्येकालाच असल्यामुळें व आमचें जीवन या सांस्कृतिक कर्मांतच असल्यामुळें आम्हाला हिंदुस्थान हा आमचाच असावयास पाहिजे. ही

शास्त्रीय बाब आहे आणि शास्त्रीय बाब म्हटली कीं तिथें भावनेचा अगर सुखसोयींचा प्रश्नच नसतो.

आमच्या पूर्वजांनीं दुसरीही एक गोष्ट लक्षांत घेतली. त्यांच्या शास्त्राप्रमाणें त्यांना असा अनुभव आला कीं, जीवाच्या प्रत्येक कर्माचा ठसा आजूबाजूच्या सर्व सृष्टीवर पडत असतो व तो ठसाही कायमचा असतो. आजूबाजूची सर्व सृष्टीही मनुष्यावर आपल्या कर्माचा ठसा उमटवीत असते. म्हणजे जीव व सृष्टि हे कर्मदृष्ट्या एकमेकांपासून अलग करतां येत नाहींत. तसे ते अलग केले तर त्या दोघांतही फार महत्त्वाचें फरक घडून येतात. प्राणिशास्त्रासारख्या जड शास्त्रांतही या तत्त्वाचें प्राबल्य दिसून येते. मग आमच्या कर्मशास्त्रासारख्या सूक्ष्म व खोल शास्त्रांत याची प्रबलता किती असेल याची कल्पनाच करावी. आमच्या पूर्वजांनीं पूर्वीपासून याच भूमींत सांस्कृतिक कर्में केल्यामुळें या भूमीची प्रकृति क्रमशः पालटलेलीच असणार हें स्पष्ट आहे. संस्कारांनीं अक्षरशः विकासित झालेल्या साधनांचा अवलम्ब केला तर सांस्कृतिक कर्माची गर्भित शक्ति अनेक पटींनीं द्विगुणित होते हा कर्मशास्त्रांतला आमचा अनुभवही हिंदुस्थान हा आमचाच असला पाहिजे हें निःपक्षपातानें बजावतो. आम्हाला जिवंत राहावयाचें असलें तर शास्त्रीय गरज म्हणून हिंदुस्थान हा आमचाच आहे व वाटेल त्या आपत्तींतही तो आमचाच राहिला पाहिजे याकरितां झटणें हें आमचें परमकर्तव्य आहे. या बाबतींत आम्हांस जो विरोध करील त्याचें म्हणणें 'तुम्हांला जगण्याचा हक्क नाहीं' असेंच आहेसें समजून आम्हांला मरणांतिक लढा केलाच पाहिजे. सम्पूर्ण जग जरी आम्हाला आव्हान देऊं इच्छील तरी आम्ही मर्दपणानें साऱ्यांस तोंड देण्यास सज्ज झालें पाहिजे. वास्तविक शहाणपणा असा आहे कीं, इतर समाजांनीं, हेराल्ड लास्की यानें म्हटल्याप्रमाणें 'It is always a hazardous enterprise to suppress belief which claims to be rooted in the experi-

ences of men'—(Liberty in modern state. p. 255.) असेंच धोरण आंखावयास पाहिजे. कारण त्यांचा देशाभिमान ही एक भावना आहे. शास्त्रीय गरज नव्हे.

या प्रतिपादनावर एखादा असें म्हणेल कीं, तुमची शास्त्रीय गरज आहे, ठीक आहे. तुम्ही हिंदुस्थानांत खुशाल रहा. परंतु इतरांनीही हिंदुस्थानांत रहाण्यास काय हरकत आहे? इतर समाज राहिले म्हणून तुमची सांस्कृतिक कर्मे कां अडून बसावीत? ही शंका जरी दिसावयास यथार्थ दिसली तरी ती फोल आहे. इतर लोकांनीं या भूमींत राहूं नये व प्रपंच थाटूं नयेत असें आमच्या राष्ट्रीयत्वानें आजपर्यंत कधींच म्हटलें नाहीं. आणि दुसरा एखादा कोणी रहात असण्यानें आमच्या सांस्कृतिक कर्मा-तही विघाड होण्याचें कांहीं कारण नाहीं. खरा प्रश्न वेगळाच आहे व तो हा आहे कीं, आमचीं सांस्कृतिक कर्मे करण्याकरतां जें राज्यतंत्र व जी आर्थिक व्यवस्था आम्हाला आवश्यक आहे, ती हिंदुस्थान हा आमचाच असल्याशिवाय आम्ही उत्पन्न करूं शकणार नाहीं. इतर समाजांना खुष करण्याकरतां त्यांच्या अभीप्सेप्रमाणें जें कडबोळी राज्यतंत्र व जी आर्थिक व्यवस्था उत्पन्न केली जाईल ती आम्हांला संमत असणें केवळ अशक्य आहे. आमच्या अंतर्जीवनाविषयक कल्पनांतून निघालेलें राज्यतंत्र व आर्थिक व्यवस्था हीच आम्हाला उपकारक ठरूं शकेल. सांस्कृतिक कर्मे एकाचीं व कर्मभूमीवरील राज्यतंत्र व आर्थिक व्यवस्था दुसऱ्याची अगर भिन्न प्रकृतीची यांतही आमचें मरणच आहे. कोणताही जिवंत मानव हें मरण स्वतःवर ओढवून घेणार नाहीं. वस्तुतः देशाच्या मालकीच्या प्रश्नाला या दृष्टीनेंच महत्व आहे. आणि म्हणूनच हिंदुस्थान-वर आम्हांला आमची मालकी गाजवलीच पाहिजे.

एका दृष्टीनें पाहिलें तर हक व मालकी हे शब्दही निरर्थक आहेत. अमुक देशावर अमुक समाजाचा हक्क अगर मालकी आहे म्हणजे काय?

सृष्टीनें कांहीं आपण होऊन कोणाला कोणचा देश वांटून दिलेला नाहीं. इतिहासाच्या योगायोगांत जे समाज ज्या भूमीवर स्थिर झाले ते समाज त्या देशावर आपला हक्क अगर मालकी सांगूं लागले. जर्मन मनुष्याचा जर्मनी-खेरीज करून इतर देशावर हक्क कां असूं नये असें जर एखाद्यानें विचारलें तर कोणास काय उत्तर देतां येईल? याच्या उलट रशिया जर जर्मनीवर आपला हक्क सांगूं लागला तर तें अन्यायाचें आहे हें कोणत्या तत्वानुसार जर्मनीस म्हणतां येईल? साम्राज्याकांक्षी लोक आपलें साम्राज्य जें प्रस्थापित करतात तें कोणत्या हक्काच्या बळावर करतात? सारांश सृष्टीला हक्क व मालकी या गोष्टी परिचित नाहींत. सृष्टीला एकत्र एक गोष्ट नित्य परि-चयाची आहे, व ती म्हणजे निसर्गनियम ही होय. जगांतली इतर राष्ट्रें आपापल्या देशावर निसर्गनियम म्हणून हक्क अगर मालकी दाखवीत नाहींत. साऱ्या जगांत एकच एक राष्ट्र असें आहे कीं, जें निसर्गनियम व शास्त्रीय गरज म्हणूनच भारतावर आपला हक्क सांगतें, आणि तें म्हणजे हिंदुराष्ट्र होय. हक्क अगर मालकी या गोष्टींना कांहींच बूड नसल्यामुळें व त्या केवळ मन-गटाच्या बलाबलावरच ठरणाऱ्या असल्यामुळें भारतीयांनीं भूविभाग त्यांच्याद्वारें केला नाहीं. त्यांनीं तो विचार न्यायान्यायाच्या कसोटीवर केला आहे. आणि न्यायान्यायाची कसोटी केव्हांही काय शास्त्रीयच असूं शकत असल्यामुळें भारतीयांचें 'हिंदुस्थान हा हिंदूंचाच' हें ब्रीद पूर्णपणें न्याय्य आहे असें निःपक्षपातानें कबूल करणें प्राप्त आहे.

भारतीयांनीं पुरातन कालापासून भारतविषयक जी धारणा धरली आहे त्याचें मर्म वाचकांसमोर शक्य तितकें उद्घटित करून मांडलें आहे. या धारणेप्रीत्यर्थ वेळप्रसंगीं त्यांनीं अपूर्व त्यागही केले आहेत, अपूर्व अशी प्राणांची रोषनाईही त्यांनी वेळोवेळीं उजळली आहे. स्त्रीपुरुष, गरीब-श्रीमंत, बालवृद्ध अशा सर्वांनीं आपलें हें ब्रीद आजपर्यंत जगन्मान्य करून घेतलें आहे. तेव्हां आज आम्ही नानातऱ्हेच्या मोहांना बळी पडून या ब्रीदास संकुचित ठरविण्याचा अगर त्यास आज अनुपयोगी ठरविण्याचा जो भेकडपणा करीत आहोत तो माणुसकीस कितपत धरून आहे याचा सावधतेनें विचार करणें अवश्य नाहीं काय?

राष्ट्रीयत्वाचीं आणखी इतर अंगें.

वंशविचार

आमच्या राष्ट्रियत्वानें आपल्या अंतर्जीवनाविषयक कल्पनांना धरूनच वंशाचाही विशेष विचार केला आहे. आधुनिक प्राणिशास्त्रास जो फायदा कधींच मिळाला नाहीं तो आमच्या शास्त्रांना भरपूर मिळाला असल्यामुळें वंशाविषयक गुंतागुंतीचे प्रश्न व त्यांचीं निश्चित उत्तरें आमच्या शास्त्रांस देतां आली आहेत. डॉ. अलेक्सिस कॅरेल यानें म्हटल्याप्रमाणें मानवी शरीरावर जे नानाविध अंतर्बाह्य संस्कार होतात त्या सर्वांचा परिणाम पहावयाचा झाल्यास निदान एक शतक तरी सूक्ष्म निरीक्षण करणें आवश्यक असतें. (Man the Unknown P. 59). परंतु अशा पद्धतीचे संतत प्रयत्न अजून विज्ञानास अपरिचितच आहेत. आमच्या राष्ट्रियत्वास या दृष्टीनें फार मोठा फायदा लाभला आहे. नुसतें एक शतकच काय पण अनेक सहस्रकें आमचा समाज शास्त्रीय पद्धतीनें टिकत आला असल्यामुळें त्याला नानाप्रकारचे प्रयोग करण्यास फावलें व त्या प्रयोगांचे इष्टानिष्ट परिणामही ठरवितां आले.

आम्ही वंशविचार काय केला हें सांगण्याच्या अगोदर आजच्या शास्त्रांनीं वंशविचार काय केला हें थोडक्यांत पाहूं. जननशास्त्राप्रमाणें असें ठरलें आहे कीं, मनुष्याच्या आनुवंशिकतेचें मूळ शुक्ररजांच्या बीजावयवांत (Gene मध्यें) आहे. समाजाची गुणपरंपरा यांच्या द्वारेंच

अखंड राहते. परंतु वंशाचे गमक काय असावें हें अजूनही निश्चित होत नाहीं. अन्तर्बाह्य परिस्थितीचा परिणाम मनुष्यावर होतो ही गोष्ट सर्वांना मान्य आहे. परंतु हे परिणाम आनुवंशिक होतात किंवा नाहीं याबद्दल वाद आहे. व्यक्तीनें संपादिलेले गुण त्याच्या संततींत उतरतात किंवा नाहीं हा प्रश्न विवाद्य आहे असें म्हटलें तरी शास्त्रज्ञांस एक गोष्ट मान्य आहे; ती ही कीं मनुष्याच्या शरीरांत जे अनेक द्रवपदार्थ (humors) महत्त्वाचीं कार्यें करीत असतात त्यांच्यांत परिस्थितीप्रमाणें फेरबदल होतात. या फरकामुळें त्यांत सतत न्हाणारे शरीर धातूही (Tissues) त्यांच्याशीं मेळ घालीत स्वतःची रचना पालटीत असतात. शरीराचें लैंगिक मूळ घटक (Sexual Tissues) अशा तऱ्हेनें पालटले कीं संततीवर परिणाम होऊन वंशही बदलूं लागतो. (Man the unknown. P. 204) असें असल्यामुळें मानवाच्या घटनेंत आनुवंशाचें व संस्काराचे सापेक्ष महत्त्व ठरवितां येणें कठीण झालें आहे. परंतु आनुवंशिकता ही मुळांत कांही तरी सत्य गोष्ट आहे हें सर्वांसच मान्य आहे. संस्कारांची परिणामक्षमता तिच्यावरच अवलम्बून आहे हेंही बव्हंशीं सर्वसंमतच आहे. म्हणजे समाजाचा गुणोत्कर्ष सतत रहावयाचा असल्यास समाजानें आनुवंशाचे नियम पाळले पाहिजेत असें आजचें शास्त्र सांगते. परंतु मनुष्यावर अन्तर्बाह्य नानातऱ्हेचे परिणाम होत असल्यामुळें ही आनुवंशिकता अखंड रहाणें अशक्य होतें, किंबहुना विविध व इष्टानिष्ट संकरही होतो. तेव्हां या दोन्हीही गोष्टींचा मेळ कसा घालावा हें शास्त्रज्ञांना उमजेनासें झालें आहे.

आमच्या प्रज्ञावंतांनी त्यांत उत्तम तोड सुचविली आहे. त्यांनीं तर हा अनुभव घेतलाच कीं, वंशशुद्धीशिवाय संस्कृति टिकूं शकत नाहीं. शुद्ध वंश संस्कृति उत्पन्न करतो व संस्कृति शुद्ध वंश निर्माण करते हा अन्योन्य संबंध त्यांना पूर्णपणें समजल्यामुळें त्यांनीं या दोहोंचीही कार्यक्षेत्रें व परिणामशीलता निश्चित केली.

मनुष्यशरीर यंत्र नसल्यामुळें त्याच्यांत वाटेल त्या परिस्थितीशीं मेळ-घालण्याची समर्थता (adaptation) इतर प्राण्यांपेक्षांही, अनेकपट आहे. यामुळें मूळ वंशाची मूर्ति वितळून न जातां हे फेरबदल घडावे अशी त्यांनीं योजना केली. शुद्धवंश पुष्कळशा कालान्तरानें कां होईना, पण शारीरिक जोमाच्या दृष्टीनें अक्षम बनतो. तेव्हां त्याला क्षम बनविण्याचा उपाय, पद्धतशीर रीतीनें घडविलेला कां असेना, पण संकरच राहतो. अनुलोम संतति उत्पन्न करून कालान्तरानें जात्युत्कर्षाच्या तत्वाप्रमाणें त्यांना मूळ-वर्णांत समाविष्ट करून घेणें ही त्यांची पहिली उपाययोजना होय. दुसरी अशी कीं, परकीय समाज आपल्या सहवासांत ठेवून व बहुशः त्यांच्या करितांच उत्पन्न केलेलें तंत्रशास्त्रासारखें शास्त्र त्यांना देऊन संस्कृतिसाम्य उत्पन्न करावयाचें व कालावधीनें त्यांना आपल्या समाजांत अन्नाप्रमाणें सहजसात्म्य पावूं द्यावयाचें ही दुसरी उपाययोजना होय. या पद्धती-मुळें आमच्या वंशाची शुद्धता कायम राहून, संस्कृतीचा उत्कर्ष स्थिरावून, आवश्यक तेवढ्या संकरानें आमच्या समाजाचा शारीरिक जोम सदैव नवाच राहिला. हिंदु समाजांत अनेक परकीय समाज पचवून घेतले गेले हें आधुनिकांचें म्हणणें कांहींसें खरें आहे. परंतु ते कांहीं शास्त्रानुसार पचवून घेतलें गेले हें लक्ष्यांत न घेतल्यामुळें ते आज घिसाडघाईच्या शुद्धीकरणाच्या कच्छपी लागले आहेत. यामुळें आमच्या समाजाचें निश्चित अकल्याण होईल हें काय सांगावयास पाहिजे? वर वर्णिलेल्या पद्धतीनेंच जर आम्हीं वंश व संस्कृति यांच्या संबंधाचें कोडें सोडविलें तरच तें आमच्या राष्ट्रियत्वास धरून सुटलें असें होईल; एरव्हीं होणार नाहीं.

भाषा व वाङ्मय

भाषेच्या द्वारें आपलें मनोगत व्यक्त करावयाचें हा मनुष्याचा इतर प्राण्याहून विशेष आहे. भाषा हें मनुष्यजीवनाचें प्रतिबिंब आहे.

मनुष्य जें जें जीवन जगतो तें तें तो भाषाद्वारें बाहेर प्रकट करतो. मनुष्याचें सर्व जीवन त्याच्या अन्तर्जीवनविषयक कल्पनांनीं घडविलें असल्यामुळें भिन्न भिन्न मानवी गटांनीं उत्पन्न केलेल्या भाषेंत कांहीं वैशिष्ट्यें आढळून येतात. S. D. Madariaga या सुप्रसिद्ध स्पॅनिश प्रोफेसरानें 'A Grammer is a philosophy' असें जें म्हटलें आहे तें खरोखरच मार्मिक आहे.

आमची संस्कृति ज्या भाषेंतून निघाली आहे ती संस्कृतभाषा या सत्याचें मूर्तिमंत उदाहरण आहे. जगत्, यज्ञ, जीव इत्यादि नेहमींचेच शब्द जरी पाहिलें तरी त्यांवरून हें निश्चितपणें दिसून येतें कीं, आमच्या अंतर्जीवनविषयक कल्पना आमच्या भाषेंत ओतप्रोत भरल्या आहेत. जें अखंड गतिमय आहे तें जगत्, जगन्मय गतीचें विक्षेपण करून मूळची वस्तु अनेकपटींनें परत मिळण्याची जी प्रक्रिया तो यज्ञ, अणू-अणूंच्या स्पंदनासही जो धारण करतो तो जीव असे या वरील शद्बांचे मूलार्थ आहेत. आमच्या अन्तजार्वनविषयक कल्पनांची थोडशिही ओळख असलेला मनुष्य आमच्या भाषेचें वैशिष्ट्य मान्य केल्याशिवाय राहणार नाहीं. राष्ट्रीय भाषा कोणती असावी याबद्दल आमच्या देशांत जे वाद चालू आहेत ते वस्तुतः व्यर्थ आहेत. भ्रामक अशा राष्ट्रीय ऐक्याकरतां एका धेडगुजरी भाषेचा अंगीकार करा असें म्हणणें म्हणजे आमच्या अन्तर्जीवनविषयक कल्पना आम्ही टाकून द्याव्या असें म्हणण्यासारखेंच आहे. आणि हें केवळ अशक्य आहे. आम्हाला जगावयाचें असेल तर मानवाचें जगणें हें केव्हांही सांस्कृतिक दृष्ट्या जगणेंच असणार-आमच्या अन्तर्जीवनविषयक कल्पना प्रतिबिंबित झालेली भाषाच आम्ही राखली पाहिजे. इतर भाषांत कांहीं वेगवेगळ्या सोई व वेगवेगळे गुण असतीलही, नाहीं असें नाहीं. रंतु आम्हाला आमच्या भाषेचा आग्रह कांहीं शास्त्रीय कारणांकरताच

धरणें भाग आहे. आमचें सांस्कृतिक जीवन व आमची भाषा या दोन्ही गोष्टी अभिन्न आहेत. ' यज्जीवनजीवनतें दुग्धीं वांचेल काय हो मीन' भिन्न राष्ट्रीय भाषा उत्पन्न करण्याची धडपड करणाऱ्यांना आमचें हें चोख उत्तर आहे. भाषेचें शुद्धीकरण करणाऱ्यांनाही आम्हांला असें सुचवावेसें वाटतें कीं, आमचा समाज जें जीवन जगत नाहीं त्या जीवनाचें निव्वळ शाब्दिक सांगाडे गळ्यांत बळेंच अडकविण्याचा हट्ट कां धरतां? भाषासमृद्धि अशा तऱ्हेनें केव्हांही होणें शक्य नाहीं. समाज तें जीवन जगूं लागला कीं, तदनुसार तो आपली भाषाही उत्पन्न करील. त्याबद्दल अट्टाहास धरण्याचें काय कारण? संस्कृत भाषेंत एकच शब्द वेगवेगळ्या छटांनीं भिन्न भिन्न शास्त्रांत उपयोजिला आहे यावरून हें म्हणणें स्पष्ट होईल. भाषेच्या शुद्धीकरणाचें तत्त्व बरोबर आहे पण तें तत्त्व अमलांत येण्यास कांहीं अवस्थान्तरें समाजास अनुभवावीं लागतात हें दुर्लक्षून कसें चालेल? असो. राष्ट्रभाषा संस्कृतनिष्ठच असली पाहिजे हा आग्रह मात्र यथार्थ आहे. मग तिची घडण व तिचा पेहेराव आवश्यकतेप्रमाणें कितीही बदलणारे असोत. नित्य व्यवहाराची भाषा व अभिजात वाङ्मयाची भाषा यांत जसा फरक असतो तसाच फरक राष्ट्रियत्वाच्या स्थैर्याकरता करणें अवश्य आहे. लुप्तप्राय होऊं पहाणारी संस्कृत भाषा पुनः प्रतापयुक्त बनवून तिच्यांत सारें अभिजात वाङ्मय उत्पन्न करावयाचें व टिकवावयाचें व नित्य व्यवहारास आपापल्या मातृभाषांचा अंगीकार करावयाचा अशा द्विदल पद्धतीनेंच राष्ट्रीय जीवन सदैव उज्जीवित ठेवतां येईल. राष्ट्रीय भाषा म्हणून जी होईल ती केवळ व्यवहारसामान्या करता होईल. हिलाच राष्ट्रीय संभाषा अशी संज्ञा द्यावी असें आम्हांस वाटतें. अभिजात वाङ्मयाच्या भाषेंत वेगळें नांव देण्याचें कारण नाहीं. संस्कृतिसंपन्नतेमुळे ती भाषा जगभर संस्कृत या योग्य नांवानें संबोधिली गेलीच आहे.

आमच्या राष्ट्रीय भाषेंत जे **शास्त्रीय वाङ्मय** उत्पन्न झालें आहे व ज्या **कलांचा ललित विस्तार** झाला आहे त्याचें ओझरतें कां असेना, निरूपण केल्याशिवाय आमच्या राष्ट्रियत्वाची सांगोपांग मूर्ति दृग्गोचर झाली असें होणार नाहीं. आमची विविध दर्शनें, धर्मशास्त्रें व पुराणें यांतून **अंतर्जीवनविषयक कल्पनांचा** ऊहापोह आढळून येतो. तेव्हां त्यांत आमचें राष्ट्रीय वैशिष्ट्य आहे हें सांगण्याची आतां वेगळी गरज नाही. तद्व्यतिरिक्त वैद्यकशास्त्र, ज्योतिःशास्त्र, स्थापत्यशास्त्र, वास्तुशास्त्र, युद्ध-शास्त्र इत्यादि जीं अनेक भौतिक शास्त्रें आहेत त्यांतही आमचें कांहीं राष्ट्रिय वैशिष्ट्य आहेच. तें न ओळखतां तद्विषयक पाश्चात्य शास्त्रांच्या **चकाकीस** बळी पडून व त्यांचा स्वीकार करुन आम्ही आमच्या शास्त्रांचा त्याग केला तर आम्ही आमच्या राष्ट्रियत्वापासून स्खलित होऊं. आमच्या समाजानें खोल विचार करून आमच्या संस्कृतीस अनुसरून असलेलें जें **वैद्यशास्त्र** उत्पन्न केलें तें आज कितीही विपटीत असलें तरी तें संशो-धनपूर्वक पुनः सजीव केलें पाहिजे. Dr. Aexio Carell नें म्हटल्याप्रमाणें मनुष्याचा सर्वांगीण विचार करूं शकणारें हेंच एक महत्त्वाचें शास्त्र आहे. इतर मानवी शास्त्रें तदुपजीवी आहेत. संस्कृतीप्रमाणें यथार्थ आचरण करण्याकरतां प्रत्येक समाजाला कांहीं **विशिष्ट असें भौतिक जीवन** (a mode of material existence) उत्पन्न करावें लागतें, हें तत्त्व आमच्या पूर्वजांनीं ओळखूनच **आयुर्वेद** उत्पन्न केला. त्यास हंसण्यापेक्षां त्याचें या दृष्टीनें नीट संशोधन जर झालें तर आजही त्याची महती कळून येईल. पाश्चात्य वैद्यक हळुंहळू त्याच मार्गावर येत आहे. आयुर्वेदांत जसें आमचें राष्ट्रियत्व आहे तसें ज्योतिःशास्त्रांतही आहे. आमच्या पूर्वजांनीं सायन गणित येत असूनही **निरयनताच** पत्करली याचें मूळ आमच्या **अंतर्जीवनविषयक कल्पना** मध्येंच आहे. पाश्चात्यांचें सूक्ष्म वेध घेऊनही आम्ही आज जें निरयन पंचांग करतो तें **सांस्कृतिक दृष्ट्या अधिक सशास्त्र** आहे.

आमच्या समाजांतले सुशिक्षित म्हणविणारे लोक अमेरिकन अगर फ्रेंच पद्धतीच्या इमारती **मोठ्या हौशीनें** बांधून घेतात तेव्हां त्यांना काय म्हणावें हेंच आम्हांस समजेनासें होतें. संस्कृतीचें पालन सफल होण्याकरतां या गोष्टीही विशिष्ट तऱ्हेनेंच निर्माण केल्या पाहिजेत. हें तत्त्व जर लक्ष्यांत घेतलें तर असें म्हणणें भाग आहे कीं, **पाश्चात्य पद्धतींच्या गृहयोजना कुचकामीच** नव्हेत तर **अनर्थकारी** आहेत. आंतला जीव मनुष्याचा व शरीर पशूचें असें जर झालें तर त्या जीवास मानवी कर्म करणें जसें अशक्य होईल तसेंच या पाश्चात्य इमारतींतल्या जीवनानें आम्हांस आमचीं **सांस्कृतिक कर्में** करतां येणें अशक्य होईल. तीं कर्में सुशक्य व सफळ व्हावी याकरितांच आमच्या पूर्वजांनीं **गृहपद्धति** इत्यादि गोष्टींचा सूक्ष्म विचार केला. **नगर-रचनाही** संस्कृतीच्या **कर्मशास्त्रासच** अनुसरून पाहिजे. ज्या राष्ट्रियत्वांत या महत्वाच्या गोष्टींचा विचार नाहीं तें राष्ट्रियत्व विकलांगच म्हटलें पाहिजे. आमच्या पुढाऱ्यांनीं वरील गोष्टींचा विचार करावयास नको काय ? युद्धासारख्या तमोगुणी गोष्टीसही आमच्या पूर्वजांनीं शास्त्राच्या चौकटींत बसवून टाकलें आहे. आमचें **युद्धशास्त्र** आमच्या **कर्मशास्त्रांतून** निघालें असल्यामुळें त्यालाही विशेष रूपरंग आला आहे. यापलीकडे देखील आम्हांला जर आमचें **युद्धशास्त्र** उत्पन्न करावयाचें असेल तर तें **कर्मशास्त्रमूलकच** असलें पाहिजे. तरच तें आमच्या राष्ट्रियत्वास धरून होईल. आमच्या इतर शास्त्रांचाही विचार या पद्धतीनेंच व्हावयास पाहिजे.

संगीत, चित्र, नृत्य, शिल्प, नाट्य, काव्य इत्यादि **कलांतही** आमचें राष्ट्रीय वैशिष्ट्य आहे. या सर्व **कलांचा उगम** आमच्या **कर्मशास्त्रांतूनच** झाला असल्यामुळें त्यांची प्रकृति विशेष बनली आहे. ती प्रकृति लक्ष्यांत न घेतां आज चाललेले नानातऱ्हेचे वाद आम्हांस दिग्भ्रष्ट करीत आहेत. आमच्या सर्व **कलांचें हृदय** थोडक्यांत असें सांगतां येईल.

वेद म्हणतात कीं, 'परोक्ष प्रिया इव हि देवाः'. दिव्यतेंतून झरणाऱ्या आमच्या कलाही **परोक्षप्रिया** आहेत. ज्या संवेदनांचा प्रत्यय अंतःकरणास द्यावयाचा असेल त्या संवेदनाच फक्त त्यांत उत्पन्न व्हाव्या, त्यांना निमित्त होणाऱ्या साधनांच्या रूपांविषयीं मात्र **रति उत्पन्न होऊं नये** हें आमच्या सर्व **कलांचें बीज** आहे. या बीजांतून त्यांचा विस्तार होतो व या बीजांत त्यांचा उपसंहार होतो. ही गोष्ट साधण्याकरितां आमच्या प्रज्ञावंतांनी रूपास **गौणता** देऊन व कांहींदां त्यास **सांकेतिक काया** देऊन नवरसांचे सोलीव गरे रसिकांना अर्पण केले आहेत. इतरांच्या कलाकृतींत रूप व रंग यांना संवेदनांइतकेंच महत्त्व दिलें असल्यामुळें, श्रीसमर्थांनीं म्हटल्याप्रमाणें 'भेटीं जातां राजद्वारीं। धरोनी नेला वेगारी। कळावंतां तैसी परी। कळेनें केली।' असा प्रकार घडला आहे. रूप व रंग यांनीं संवेदना झांकून न टाकतां, स्वच्छ प्रवाह तळाशीं असलेल्या वस्तूंना ज्या प्रमाणें निरीक्षकाच्या आधिक जवळ आणतो त्या प्रमाणें त्या **पारदर्शक** होऊन रसिक व संवेदना यांचा हृदयंगम संगम व्हावयास पाहिजे. Cupid या सुप्रसिद्ध नग्न–चित्रांत कला नाहीं असें नाहीं. आमचें राष्ट्रियत्व असें म्हणतें कीं, वेषभूषा असूनही Cupid च्या विविध आविर्भावाचें चित्रीकरण करण्यास जी कुशलता लागते ती **आधिक कलामय** असते. कारण तसें करण्याकरितां **व्यंजनेची** (Suggestion) **प्रसाधनसृष्टि** कलावंतास निर्मावी लागते. त्यामुळें रूप व रंग गौण ठरून निखळ संवेदनाच रसिक हृदयास व्यापते. सखींनीं अन्तःपुरापर्यंत नायिकेस नेऊन नायकाशीं **एकांत** घडवून देण्याची जबाबदारी पार पाडावयाची व स्वतः निमूटपणें **निवृत्त** व्हावयाचें त्याप्रमाणेंच हें आहे. बाह्य साधनांनीं निवृत्तच झालें पाहिजे. रसिक व रसधारा यांच्यामध्यें लुडबुडण्याचें त्यांचें काम नाहीं.

आमच्या पूर्वजांनीं कलेची एक **कसोटी** ठरविली आहे. रसिकास 'आपलें अंतःकरण उंचावलें आहे' असा क्षणभर कां होईना पण

प्रत्यय जर दिला नाहीं तर ती कला नव्हे, अवकळा होय असें त्यांचें प्रतिपादन आहे. मनुष्याच्या स्वभावांत ज्या अनेकविध उच्चतम भावना (best mental states) आहेत त्या भावनांचा प्रत्यय कलावंतानें रसिकास आणून दिला पाहिजे. तसें न करतां अंतःकरणांतल्या सामान्य भावनाच कलावंत चित्रित करील तर रसिकाची संस्कृति उदात्त होण्याची संधि कधी उत्पन्न होणेंच शक्य होणार नाहीं. 'सर्पीं वेढिलें चंदनासी। कां निधाना आड विवसी। नाना कळा देवासी। आड तैशा।' असें घडूं नये ही खबरदारी आमच्या राष्ट्रियत्वानें पुरेपूर घेतली. उन्नत अवस्थांचा अनुभव येऊन अंतःकरण थोडेसेंही थरारून गेलें नाहीं असा करंटेपणा कधींच उत्पन्न होणार नाहीं ही काळजी घेतल्यामुळेंच आमच्या सर्व कलांत कांहीं संकेत व नियम उत्पन्न झाले. आमच्या संगीतांतील रस, राग व काल यांचे संबंध, स्वरांची वर्ज्यावर्ज्यता, राग-रागिण्यांची स्वरूपें, स्वरांच्या मागें वर्ण, वंश, गोत्र, देवता, रंग इत्यादि नियमांचें लाविलेलें लिगाड इत्यादि गोष्टी आमच्या अन्तर्जीवन-विषयक कल्पनांतूनच उद्भवल्या आहेत. आमचें नाट्य-तंत्र आणि नृत्य-तंत्र व त्यांचे नियम हेही तसेच आहेत. चित्रकला व शिल्पकला यांच्यांतले संकेत व विधिनिषेध असेच मूलगामी आहेत. येथें एक गोष्ट नमूद करून ठेवावीशी वाटते. राष्ट्रियत्वाची परिवर्तनीय व अपरिवर्तनीय अशीं दोन रूपें आहेत हें आपण पूर्वार्धांत पाहिलेंच आहे. अंतर्जीवन-विषयक कल्पना या अपरिवर्तनीय असतात व त्यांचीं सप्तांगें परिवर्तनीय असतात. त्या सप्तांगांतही कांहीं स्थिरता आढळून येतेच. परंतु त्याचें मूळ त्यांच्या अन्तर्जीवनविषयक कल्पनांच्या सूत्रात्म्यांत असतें. म्हणून आमचीं शास्त्रें व कला यांत स्थिरतेप्रमाणेंच परिवर्तनीयताही आहे. आजच्या काळास अनुसरून आमच्या कलांचा नवावतार सहज घडूं शकेल. एवढेंच

कीं, त्यांचा **सूत्रात्मा** त्यांत ओतप्रोत असला म्हणजे झालें. हें जोपर्यंत आम्ही साधूं शकणार नाहीं तोपर्यंत आमचे प्रयत्न कितीही उदंड असले तरी आमच्या राष्ट्रियत्वास धरून होणार नाहींत. आजच्या सर्व धडपडी **सूत्रात्मा** काढून टाकण्याच्या आहेत. म्हणून त्या **निर्जीव** व **अंध** आहेत. आतां आपण आपल्या **राज्यव्यवस्था** व **अर्थव्यवस्था** या विषयाकडे वळूं.

राज्यव्यवस्था

राज्यतंत्राच्या उत्पत्तीबद्दल विद्वानांच्या वेगवेगळया उपपत्ती आहेत. या सर्वांत मार्क्सिस्टांची वर्गविग्रहाची उपपत्ति मोठी **अकांडतांडव** करणारी आहे. आमचीं शास्त्रें असें सांगतात कीं, राज्यतंत्र तेव्हांच उत्पन्न झालें कीं जेव्हां मानव अवनत झाला. त्याची अवनति थांबवून त्याला उन्नत करावयाचें या करतां राज्यसंस्था उत्पन्न झाली असें महाभारतादि ग्रंथ सांगतात. आमची **विकासकल्पना** काय आहे हें पूर्वी दाखविलेंच आहे. अतीन्द्रिय विश्वांतल्या शक्ती या विश्वांत उतरवून त्यांच्या साह्यानें उत्कर्ष घडवावयाचा हें तत्व आमच्या राज्यसंस्थेंतही अनुस्यूत आहे. देवतांचे अंश घेऊन राजा बनविल्याचें जें रूपक आमच्या ग्रंथांत वर्णिलेलें असतें त्याचा अर्थ हा आहे. मानवी विकासाकरितांच राज्यसंस्था उत्पन्न होते असें म्हणणाऱ्या मार्क्सिस्टांत व आमच्यांत रामरावणासारखा जो फरक पडला त्याचें कारण वरील अर्थांत आहे.

सर्व मानवी कृतीस 'सर्वारम्भा ही दोषेण धूमेनाग्निरिवावृताः' हा गीतोक्त नियम लागू आहे हें लक्ष्यांत घेणाऱ्या आमच्या पूर्वजांनीं राज्यतंत्राच्या रूपाबद्दल (form) कधींच आग्रह धरला नाहीं. सशास्त्र अनुभवानें **समाजसंस्था** उत्पन्न करणाऱ्या भारतीयांनीं हें लक्ष्यांत ठेवलें कीं, **प्रत्येक राज्यतंत्र सच्छिद्र** असणें अपरिहार्य आहे. म्हणून जास्तीतजास्त

उपकारक होईल असें राज्यतंत्र शोधावयाचें परंतु त्याच्यावरच सर्व मदार न ठेवतां संस्कृतीवर ती ठेवावयाची. जर्मन व रशियन अधमांची काळीं कुट्ट काळिजें विदारकपणें उजेडांत आणणाऱ्या Jan Valtin (Out of the Night) नेंहि अखेरीस अशाच तऱ्हेचा सिद्धान्त प्रतिपादिला आहे. (ना. सी. फडके यांच्या 'वादळा' ची प्रस्तावना पहा.) राज्यतंत्राला जी किंमत येते ती त्याची उत्पत्ति करणाऱ्या समाजाच्या सांस्कृतिक दर्जामुळेंच येते. राज्यतंत्र उत्तम पण तिचा निर्माता जो मानवी समाज तो मात्र पाशवी असें जर असलें तर तें राज्यतंत्र जगास सुखकारक न होतां अनर्थकारकच होतें. यूरोपीय राष्ट्रांचा इतिहास हें स्पष्टपणें दाखवितो.

आमच्या मेधावी पूर्वजांनीं '**धर्माय राजा भवति न कामकरणाय तु**' ही जी वृत्ति उत्पन्न केली ती आमच्या विकासकल्पनेची यथार्थता दाखविणारी आहे. **संस्कृति** हें साध्य व **राज्यतंत्र** हें **साधन** असें त्यांनीं निश्चित ठरविल्यामुळें आमच्याकडे राज्यतंत्र **सर्वंकष** कधींच झालें **नाहीं**. कोणत्याही समाजांत संस्कृति उत्पन्न करणारा वर्ग म्हणून एक **वेगळा गटच** उमटून पडत असतो. तो वर्ग **सांस्कृतिक मूल्यें** संपूर्णपणें पाळणारा असतो. सत्ता व पैसा या गोष्टी त्या परिपालनाच्या आड येतात हें जाणूनच आमच्या शास्त्रांनीं संस्कृति उत्पन्न करणारा वर्ग व संस्कृतीचें बाह्य आक्रमणापासून **संरक्षण** करणारा वर्ग असे **दोन स्वतंत्र वर्ग** उत्पन्न केले. एकाच समाजांत हर्बर्ट स्पेन्सरच्या शुद्ध नीतीची (Absolute Ethics) व संमिश्र नीतीची (Relative Ethics) याप्रमाणें व्यवस्था लाविली. सत्ता गाजविणाऱ्या वर्गाच्या शिक्षणाची जबाबदारी संस्कृति उत्पन्न करणाऱ्या वर्गाकडे दिल्यामुळें आमचा राज्यकर्ता **विशेष शिस्तींत** तयार झालेलाच असे. '**राज्यस्य मूलमिन्द्रियनिग्रहः**' (चाणक्यसूत्र) ही शिकवण प्रभूतपणें आमच्याच समाजानें दिली. राजा हा राष्ट्राचा **स्वामी नसून** फक्त **परिपालक** आहे, त्यामुळें तो जर दुष्टात्मा बनून प्रजापीडन करूं लागला तर

त्याला पदभ्रष्ट करण्याचा **अधिकार प्रजेस** आहे या शिकवणींत खऱ्या लोकशाहीचें तत्त्व पुरेपूर आलें आहे.

"प्रजापीडनसंतापात्समुद्भूतो हुताशनः।
राज्ञः कुलं श्रियं प्राणांश्चादग्ध्वा न निवर्तते ॥ मनु ॥"

प्रजातत्पर नसलेल्या राजांना राज्यभ्रष्ट करुन दुसऱ्या राजाची स्थापना गादीवर प्रजेनें केल्याचीं उदाहरणें आमच्या इतिहासांत कोणालाही वाचावयास सांपडतील. मतमोजणी न करतांही साधणारी **लोकशाही** आमच्याच समाजानें जगाच्या निदर्शनास आणली आहे.

समाजाची धारणा आनुवंश व संस्कार या दोन शास्त्रांनीं होते त्याप्रमाणेंच **राज्यसंस्थेचीही** होते ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन आमच्या पूर्वजांनीं राजांची व त्यांच्या पुरोहितांची कुलपरंपरा उत्पन्न करून दिली आहे. या योजनेंत **हुकुमशाही** व **लोकशाही** या दोनही पद्धतींची **सहजसुंदर गुंफण** झाली आहे. संपूर्ण जग द्वन्द्वरूप आहें हें ओळखणाऱ्या भारतीयांनीं **राज्यसंस्थेंतलेंही** द्वन्द्व ओळखलें. राजकुलांच्या द्वारें त्यांनीं समाजांत सत्तेचें जसें **केन्द्रीकरण** केलें त्याप्रमाणेंच स्वयंपूर्ण अशा **ग्रामसंस्थांच्या** द्वारा सत्तेचें **संविभजन** केलें. आमच्या संस्कृतीस अनुसरून भारतीय राज्यसंस्थेनें आपलें **परराष्ट्रीय धोरण** आंखलें होतें. मनुस्मृतींतील या संबंधाचें वर्णन वाचलें म्हणजे या गोष्टीची उत्तम साक्ष पटते. आमच्या राज्यसंस्थेचें स्वरूप थोडक्यांत हें असें आहे. हिच्या द्वारें आम्हांस अनंत काळापासून **निरतिशय सुख** लाभलें आहे. एका उपनिषदांतील राजानें 'न मे स्तेनो जनपदे न कदर्यो न मद्यपः। नानाहिताग्निर्नाविद्वान् न स्वैरः स्वैरिणी कुतः।' अशी जी यथार्थ प्रौढोक्ति काढली आहे ती इतर कोणच्याही समाजाच्या राजानें काढलेली जगाच्या इतिहासांत कोठेंतरी आढळेल काय? आमची **राष्ट्रीय राज्यसंस्था टाकून** देऊन एखादी फॅसिस्ट अगर कम्युनिस्ट राज्यसंस्था पत्करणें हें माणुसकीस तरी धरून होईल काय?

अर्थव्यवस्था

अलीकडे **अर्थशास्त्र** म्हणून ज्याला संबोधण्यांत येतें तें व आमचें अर्थशास्त्र यांत **महदन्तर** आहे. अर्थ ही एक **मानवी प्रवृत्ति आहे,** असे आमच्या पूर्वजांनीं अनुभवानें ठरविलें आहे. त्यामुळें त्यांनी या शब्दाचा अर्थ **अतिशय व्यापक** केला आहे. त्यामुळें त्यांनी मनुष्य स्वभावाचा सांगोपांग अभ्यास करून आपलें **अर्थशास्त्र** उत्पन्न केलें आहे. प्रचलित अर्थशास्त्राची मार्शलनें जी व्याख्या केली आहे त्यांत " Thus it is on the one side the study of wealth, & on the other, and more important side, a part of the study of man असें म्हटलें असलें तरी तें **शास्त्र मानवनिरपेक्षच** आहे असें दिसून येतें. त्यांत मनुष्याची एकही स्वभावकला नीटपणें अभ्यासिल्याचें दिसून येत नाहीं. मानवनिरपेक्ष धन–संपत्तीचाच प्रामुख्यानें विचार आहे.

अर्थव्यवहाराचे **मानवनिरपेक्ष** कांहीं **अढळ नियम** आहेत हा दर्प बाळगणाऱ्या अर्थशास्त्रानें मानव्याचा केवढा **सत्यानाश** केला आहे हें आतां सर्वजण कबूल करीत आहेत. रस्किनच्या काळापासून या शास्त्रा-वर एकसारखे हल्ले होतच आले आहेत. मार्क्सिस्टांनीं सर्वांत जोराचा हल्ला केला हें सुप्रसिद्धच आहे. पण त्यांनींही या शास्त्राची मानवनिरपेक्षता एका तऱ्हेनें अढळच केली आहे. आणि त्यामुळेंच त्यांनी सुच-विलेलें आर्थिक नियोजन मानवास हितकारी होणार नाहीं असें पुष्कळ विचारवंतांस वाटूं लागलें आहे. आमच्या शास्त्राचेंही असेंच म्हणणें आहे. परंतु त्याचें श्रेष्ठपण यांत आहे कीं, त्यानें **मनुष्यस्वभावाचा सर्वांगीण विचार** करून मगच त्याच्या अर्थव्यवहाराचें निरीक्षण केलें आहे. यामुळेंच आमचें **अर्थशास्त्र** विशेष तऱ्हेचें बनलें आहे. मनुष्यस्वभावाचा सर्वांगीण विचार करणारें शास्त्र म्हणजे **धर्मशास्त्र** होय. या शास्त्रास

आमचें अर्थशास्त्र शरण गेलें आहे. 'अर्थशास्त्रात् तु बलवद्धर्मशास्त्रमिति स्थितिः'. यावरूनच हें लक्ष्यांत येईल कीं, आमचें अर्थशास्त्र हें पूर्वीपासूनच नियोजित (planned) आहे. आजच्या आर्थिक परिस्थितीवर नियोजन हाच एकमेव उपाय आहे असें सर्वच राष्ट्रें म्हणतात. परंतु हा उपाय त्याच्या स्वरूपावर जसा अवलम्बून आहे तसाच किंबहुना त्यापेक्षांही अधिक तो ज्या संस्कृतींतून उत्पन्न झाला आहे त्या संस्कृतीप्रमाणें समाजास इष्टानिष्ट ठरेल. म्हणजे राज्यतंत्राप्रमाणेंच अर्थनियोजनही **रचनाप्रधान नसून संस्कृतिप्रधान** आहे. आमच्या राष्ट्रानेंही अलोट संपत्तीचा उपभोग उद्योग, व्यापार व शेती यांच्या द्वारें सहस्त्रवर्षें घेतला आहे. परंतु त्याची उपभोगाची पद्धति इतरांहून वेगळी आहे. अलोट संपत्तीचा एखाद्यास उपभोग घ्यावयाचा असल्यास अर्थनियोजन आवश्यक आहे हें आधुनिक म्हणणें आमच्या पूर्वजांनीं प्रत्यक्ष व्यवहारांत यशस्वितेनें उतरविलें होतें. कौटिलीय अर्थशास्त्राची 'अध्यक्ष' निर्मिति पाहिली म्हणजेही या म्हणण्यांतलें सत्य ध्यानांत येईल. परंतु अर्थनियोजनांत जसे गुण उत्पन्न होतात तसेच कांहीं दोषही उत्पन्न होतात हें समजून असणाऱ्या भारतीयांनीं अर्थनियोजनालाही कांही **मर्यादा** घातल्या होत्या.

मानवी वासनांचें संतर्पण करण्याकरतां **अर्थशास्त्र** आहे हें मान्य असूनही आजच्या अर्थशास्त्रानें त्यांचा सांगोपांग विचार मुळींच केला नाहीं. आमच्या शास्त्रानें **वासनांचाच** प्रामुख्यानें विचार केला असल्यामुळें त्याला **वेगळी** अर्थरचना अमलांत आणतां आली. संस्कृति उत्पन्न करणें, सत्ता गाजविणें आणि धनोत्पादनांच्या साधनांचा मालक असणें या **तीन गोष्टी** एकाच **वर्गाकडे** असल्या तर विनाशक घोंटाळे उत्पन्न होतात हें लक्ष्यांत आल्यामुळेंच आमच्या शास्त्रानें या **तीन** गोष्टींची जबाबदारी वेगवेगळ्या **तीन वर्गांवर** दिली. सत्ता व पैसा यांचें एकीकरण होऊं न देतां **अन्योन्यावलम्बी** करून यांना संस्कृति

उत्पन्न करणाऱ्या वर्गाच्या **शिस्तीनुसार** नांदावयास लाविलें आहे. संपत्तीचें संपादन, तिचा संचय व तिचें विभजन समाजानुकूल व्हावें म्हणून कृषिगोरक्षवाणिज्य हेंच **स्वभावकर्म** असलेल्या वर्गासही राज्यकर्त्यांप्रमाणेंच संस्कृतिशिक्षकाच्या शाळेंत पढावयास लावलें आहे. यामुळें आमच्या समाजांत कोणच्याही तऱ्हेची पिळवणूक उत्पन्न होऊं शकली नाहीं. कोणच्याही समाजांत असा एक बहुसंख्य वर्ग असतोच कीं जो संस्कृति निर्माता, सत्ताधीश व धनेश यांच्या दर्जात पडत नाहीं. असा वर्ग निसर्गतःच **समाजसेवा** करणारा असतो. समाजाला त्याचीही काळजी घेतलीच पाहिजे. आमच्या शास्त्रांनीं त्याला **सारे सुखोपभोग** मिळतील एवढी खबरदारी तर घेतलीच पण दुसरीही एक खबरदारी घेतली. ती ही कीं '**शक्तेनापि हि शूद्रेण न कार्यो धनसंचयः**' (मनु) सारी सुखसंपत्ति असलेल्या शूद्रानें धनसंचय मात्र करूं नये कारण धनाच्या बळावर तो संस्कृति–निर्मात्या वर्गास **बाध** आणूं शकतो.

'जैसा तृणाचा पोटराकळा। उकलूनि होये मोकळा। तैसी माया अवलीळा। गुणा प्रसवली। ' या पद्धतीनें सृष्टिविकास होतो असें आमची शास्त्रें सांगतात. समाजही असाच उकलून मोकळा होतो, त्याच्यांत अनेक इन्द्रियें निर्माण होतात व त्यांच्या वेगवेगळ्या '**कर्मचोदना**' व '**कर्मसंग्रह**' (गीता) उत्पन्न होऊन एका सांस्कृतिक जीवनरसानें तो सुसंघटित बनतो. अशा समाजाचें एक **महत्वाचें लक्षण** हें असतें कीं, त्यांत भिन्न भिन्न अवयवांची **स्पर्धा नसून** पूरकता असते. अशा समाजाची श्रेष्ठ कनिष्ठपणाची **कसोटीही** जगाविरहित असते. '**यस्य विवाहस्तस्य पूजनम्**' या म्हणण्याप्रमाणें प्रत्येक अवयव वेगवेगळ्या कार्यांच्या दृष्टीनें श्रेष्ठकनिष्ठ असतो. श्रेष्ठकनिष्ठता ही **कायमचीच** कोणास चिकटलेली **नसते**. आमचा समाजही असाच होता. त्यानें संपत्तीची व्याख्याच वेगळी केली होती. त्याच्या मतें **शील** हीच खरी

संपत्ति. श्रेष्ठकनिष्ठपणाचें पैसा हें **गमक** नसून **शील** हें आहे. या शिक्षणीमुळें आमच्या समाजांत भांडवलशाही कधींच उत्पन्न झाली नाहीं. संस्कृति–शिक्षकानें दरिद्री रहावयाचें, संस्कृति–सेवकानें उपभोगापुरतीच श्रीमंती पत्करावयाची, सत्ता व धनोत्पादक साधनें यांना एकरूप होऊं न देतां **फक्त परस्परावलम्बी** करावयाचें या युक्तींनीं आमच्या समाजाचें सर्व आर्थिक प्रश्न सुरळीतपणें सुटले. उद्योगधंदे, कला इत्यादि गोष्टी ज्या थरानें सांभाळावयाच्या त्या थरांत जातिपरंपरा निर्माण करून व प्रत्येक जातीची क्षेत्रें ठरवून देऊन **स्पर्धेची गळेकापी बंद केली.** विषमता हें जगाचें स्वरूपच असल्यामुळें अर्थविभजनांतहीं विषमता असणें **अपरिहार्य** आहे हें ओळखून आमच्या शास्त्रांनीं तिची **तीव्रता** महत्वाच्या **सामाजिक धर्मांच्या** (social values) रूपानें नाहींशी केली. धनवंतांनी दान करणें हें त्यांचें कर्तव्य ठरविलें गेलें होतें. त्यांच्या धनाचा योग्य उपयोग न झाला तर राजानें स्वतः पुलासारखे बनून 'असाधुभ्योर्थमादाय यः साधुभ्यः प्रयच्छति।' या मार्गानें **प्रजासन्तोष** घडवावा असेंही आमच्या शास्त्रांनीं सांगून ठेवलें आहे. **ग्रामसंस्थांच्या** द्वारें भांडवलाचें विभजन करण्यांत आलें होतें. आर्थिक क्षेत्रांत स्पर्धा न ठेवतां ती **सांस्कृतिक क्षेत्रांत** ठेवण्यांत आली होती.

व्यक्तीपेक्षां समाज मोठा असला तरी तो व्यक्तिमूलक असल्यामुळें व्यक्तित्वाची कोणत्याही तऱ्हेनें गळचेपी होणार नाहीं ही खबरदारी घेणें हें त्यांच्या **समाजशास्त्राचें आद्य तत्त्व** आहे. राज्यसत्तेनें व्यक्तिविकासाच्या आड जसें येऊं नये तसें **अर्थव्यवस्थेनेंही** येऊं नये हें साधण्याकरतां आमच्या शास्त्रानें व्यक्तीचा **मालमत्तेचा अधिकार** सशास्त्रपणें मान्य केला आहे. यामुळें भारतीय व्यक्तीचें **कौशल्य** व **उद्योगपरता** कायम राहून, समाजांत कळाकुसरी व फुरसत (leisure) याबाबत जे घोर प्रश्न उत्पन्न होतात त्यांचें अस्फुट असें दर्शनही आमच्या

इतिहासांत घडणार नाहीं. आजची यंत्रमय संस्कृति मनुष्याच्या स्वभावाच्या विरुद्ध कशी आहे हें डॉ. अलेक्सिस कॅरेल यानें फार चांगलें दाखविलें आहे. मनुष्यस्वभावाचा सर्वांगीण विचार करणाऱ्या आमच्या शास्त्रानें आमचा समाज समर्थ असूनही, 'महायन्त्रप्रवर्तनम्' (मनु) हें उपपातक ठरवून यन्त्रयुग–संस्कृतीस मज्जाव केला आहे. यन्त्रांची बेताल वाढ न होऊं देतांही समाज औद्योगिक कसा बनवितां येतो हेंही त्यानें दाखविलें आहे. जातिभेदामुळें लोकसंख्येचे प्रश्न आपोआप सुटून तिचें नियन्त्रण स्वाभाविक नियमांनींच अनायासें व्हावें ही खबरदारी आमच्या शास्त्रानें घेतली आहे.

आमच्या राष्ट्रियत्वाचें अर्थशास्त्र थोडक्यांत सांगणें कठीण असलें तरी आमचें मूळ धोरण लक्ष्यांत येण्यापुरतें विवेचन येथें केलें आहे. या मूळ धोरणानुसार जर आजची अर्थपद्धति निर्माण झाली तरच ती आमच्या राष्ट्रियत्वास धरून होईल. बँकिंगची पद्धति आधुनिक यंत्रसंस्कृतीचाच विशेष असल्यामुळें तिच्यांतून उत्पन्न होणारे प्रश्न आमच्या समाजासमोर त्याकाळीं नसणें साहजिक आहे. आज आमच्या राष्ट्राची निर्मिति करतांना हे प्रश्न विचारांत घ्यावेच लागतील. तेव्हां हा विचार आमच्या अर्थशास्त्राच्या सिद्धान्तांना धरूनच व्हावयास पाहिजे. रशियासारख्या एखाद्या भिन्न प्रकृतीच्या देशाचें अर्थशास्त्र उसनें घेऊन आमचा फायदा मुळींच होणार नाहीं.

इतिहास व परंपरा

इतर राष्ट्राप्रमाणें आमच्या राष्ट्राचीही एक विशेष अशी इतिहासमीमांसा आहे. जगांत इतिहासमीमांसेचे सातआठ पक्ष आहेत. ते एकांगी असले तरी त्यांत सत्यांश आहेत. या त्रोटक प्रतिपादनांत त्या प्रत्येक

पक्षाची शहानिशा करणें अशक्य असल्यामुळें आपण केवळ आमच्या इतिहासदर्शनाचा विचार करूं. आमच्या इतिहासदृष्टींत या सर्व पक्षोपपक्षांचा योग्य विचार असल्यामुळें आमची दृष्टि जास्त **व्यापक** झाली आहे.

अन्तर्जीवनविषयक कल्पनांतूनच आमची इतिहासदृष्टि निघाली असल्यामुळें इतिहासाची व्याख्याच पुढीलप्रमाणें केली आहे.

धर्मार्थकाममोक्षाणामुपदेशसमन्वितम् ।
पूर्ववृत्तं कथायुक्तमितिहासं प्रचक्षते ॥

इतिहासाचा विचार इतिहासाकरितां नसून **मानवाकरतां** आहे. म्हणून आमच्या शास्त्रांनीं मानवालाच जास्त प्राधान्य दिलें. श्वासोच्छ्वास मोजूं लागलो म्हणजे त्या मोजण्याचाच परिणाम त्याच्या गतीवर होतो. त्याप्रमाणेंच इतिहासाकडे पहाण्याच्या दृष्टीचा परिणाम इतिहासावर होत असल्यामुळेंच ती जर **यथाशास्त्र** नसली ती तर इतिहासांत बिघाड उत्पन्न करते ही अनुभवाची गोष्ट आमच्या शास्त्रानें लक्षांत घेतली व त्यानें **विशिष्ट** असें **इतिहासदर्शन** आम्हांस लाभवून दिलें.

घटनात्मक (chronological) इतिहास म्हणून ज्याला म्हणतात तो इतिहास मानवाच्या बहुविध घडामोडींपैकी एक **अंग** आहे हें पुष्कळांस मान्य होऊं लागलें आहे. मानवाच्या सर्व कर्मस्फूर्तींचें केंद्र एकदां सांपडलें कीं, या घटनात्मक इतिहासाचा उलगडा व्हावयास कांहींच वेळ लागणार नाहीं हें पटत असल्यामुळेंच वेगवेगळीं इतिहासदर्शनें **केन्द्रशोधाच्या** मागें लागलीं आहेत. आमचें शास्त्र असें सांगतें कीं, मानवाच्या **कर्मस्फूर्तींचें केंद्र** त्याच्या **अन्तर्जीवनविषयक कल्पना** होत. याचा अर्थ असा कीं, इतिहासाच्या प्रेरणा मानवाच्या **अंतर्जीवनविषयक कल्पनांत** आहेत. **अन्तर्जीवनविषयक कल्पना** म्हणजेच संस्कृति होय हें आपण पाहिलेंच आहे. म्हणून आमच्या इतिहासदृष्टीस **‘ संस्कृतिवाद ’** असें म्हणतां येईल. या दृष्टीप्रमाणें घटनात्मक इतिहासाचे प्राणभूत असलेले

काल व देश यांचें महत्व गौण ठरतें. गीतेनें म्हटलेला 'कर्मसंग्रह' व 'कर्मचोदना' यांनाच प्रामुख्य देऊन इतिहासाचा विचार केला पाहिजे. मानवाच्या दृष्टीनें इतिहास असाच पहावयास पाहिजे हें आमच्या शास्त्रांचें म्हणणें आहे.

मानव हा सृष्टीचाच एक अभिन्न घटक आहे अशीही आमची शास्त्रधारणा आहे. तेव्हां सृष्टीच्या दृष्टीनेंही इतिहासाकडे पाहिल्याशिवाय त्याची पुरती चिकित्सा झाली असें होणार नाहीं. म्हणून सृष्टि हाही एक इतिहासच कसा आहे हा आमच्या शास्त्राचा सिद्धांत संक्षेपतः वाचकांसमोर मांडणें प्राप्तच आहे. हा विचार मांडण्याकरतांच आमच्या पुराणांची निर्मिति झाली आहे. पुराणांनीं कांहीं स्वतंत्र व प्राचीन अशा वैदिक परंपरा राखून ठेवलेल्या प्रो. रॅप्सनला ज्या दिसतात त्या वस्तुतः एतद्विषयकच होत. मत्स्यपुराणानें पुराणलक्षण असें दिलें आहे.

'सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च ।
वंशानुचरितं चैव पुराणं पञ्चलक्षणम्'

जगत्सृष्टि कशी होते, त्याचे गुणक्रमानुसार परिणाम (transformation) कसे होतात, त्याचा लय कसा होतो याचें शास्त्र सांगून कांहीं ठळक प्रसंगांचा घटनात्मक इतिहास देणें हें पुराणांचें कर्तव्य आहे. पुराणांचीं स्वरूपें विस्कळित झालेलीं असल्यामुळें त्यांचा कसून अभ्यास करून आम्हाला आमची इतिहासदृष्टि अधिक परिपूर्ण करावी लागेल यांत शंका नाहीं. पण आम्हांला मुळीं इतिहासदृष्टीच नाहीं असें कोणी म्हणूं लागला तर तें वेडगळपणाचें आहे एवढेंच आम्हांस दाखवावयाचें आहे.

सृष्टि हा एक इतिहासच आहे असें आमचीं शास्त्रें म्हणतात. इतिहासाचा आत्मा काल हा आहे. तेव्हां काळाचें स्वरूप निश्चित कळल्याशिवाय इतिहासाचें म्हणजे सृष्टीचें नीट आकलन करतां येणार नाहीं असें वाटल्यामुळेंच आमच्या शास्त्रांनीं कालाचा सूक्ष्म विचार केला.

आमच्या **सांख्यशास्त्रानें** सृष्टीचा (world process) **जो सूक्ष्म** विचार केला तो इतर भारतीय शास्त्रांनींही मान्य केला आहे. **सांख्यशास्त्रानें** काल प्रकृतिस्वरूप आहे असें ठरविलें आहे. प्रकृतीची **क्रमपरिणामशः घडामोड** म्हणजेच काल. या शास्त्राप्रमाणें प्रकृतीचें स्वरूप आजचें पदार्थविज्ञान सांगतें त्यापेक्षांही अधिक जटिल (complex) आहे. ती जशी जड आहे तशीच **सजीव** व **चिद्गर्भ** आहे. अशा या प्रकृतीच्या घडामोडीचा एक विशेष आहे. तो असा कीं, प्रकृतीच्या मागच्या अवस्था पुढच्या अवस्थेंतही **शिरून** रहातात. आधुनिकांना आतां कोठें ही कल्पना येऊं लागली आहे. Bergson ची duration ची कल्पना अशाच तऱ्हेची आहे. **सृष्टीची** घडामोड अशाच तऱ्हेनें होत असल्यामुळें विश्वरूप इतिहासाच्या गतीची दिशा व रूप यांची निश्चिति **भूतकाला** प्रमाणेंच होते. **समाजगतीलाही** हाच नियम लागूं पडतो. आमच्या शास्त्रांचें म्हणणें असें आहे कीं, प्रत्येक समाजाचा भूतकाळ, वर्तमानकालांत शिरत असल्यामुळें त्याच्या उत्कर्षापकर्षांची दिशा व स्वरूप यांची निश्चिति त्यानें निर्माण करून दिलेल्या **सांचाप्रमाणेंच** होते. हा भूतकाल समाजाची उपादान-कारणाच्या दृष्टीनें असणारी **क्षमता** व या कारणानुसारच असणारी **साधनसामुग्री** यांचा नीट **संच** जमला तरच समाज **सुवर्णयुगीन संस्कृति** उत्पन्न करूं शकतो. हा समाजशास्त्रीय विचार आमच्या या विशिष्ट **इतिहासदृष्टींतूनच** निर्माण झाला आहे. हीच दृष्टि आम्हांस असेंही सांगते कीं, सुवर्णयुगीन संस्कृति निर्माण जरी झाली व तिनें मानवी समाजावर कितीही काळ सुखसंपात केला तरी ही **आदर्शावस्था** सतत कायम राहूं शकत नाहीं. प्रकृतींत **परस्पर विलक्षण** अशा तीन शक्ति असल्यामुळें तिची प्रत्येक घडामोड **मंडलाकार होते** व त्यामुळेंच अणुपरमाणुपासून तों परापरसृष्टीपर्यंत सर्व घटना उत्पत्ति-

स्थिति-लय या भ्रमणांतून फिरत असतात. समाज सृष्टिगत असल्यामुळें त्यालाही प्रकृतिमूलक फेरे अनुभवावे लागतात. या प्राकृतिक फेऱ्यांची कल्पना येण्याकरतांच पुराणांनीं चतुर्युगांची व मन्वन्तरांची सशास्त्र कल्पना मांडली आहे.

परंपरा

राष्ट्रीय परंपरांकडे पहाण्याची आमची विशेष दृष्टि आमच्या या इतिहासमीमांसेतूनच उद्भवली आहे. आमच्या इतिहासमीमांसेची यांत थोरवी आहे. कारण अमुक ही एक परंपरा टिकवावी, अमुक या परंपरेचा संकोच करावा इत्यादि विचार आमच्याच राष्ट्रियत्वांत दृष्टीस पडतात. आमच्या इतिहासदृष्टीच्या संपन्नतेची ही एक साक्षच आहे. समाजाच्या राष्ट्रीय जीवनांत नानाविध परंपरा उत्पन्न होत असतात. कित्येक परंपरा तात्कालिक असतात, कित्येक परंपरा तात्त्विक असूनही देशकालानुसार त्यांचा संकोच करावा लागतो, कित्येक भावनामूलक असतात व कांहीं अनिष्टही असतात. या सर्वांचें विवेकशास्त्र आमच्या इतिहासदर्शनांतून उत्पन्न झालें आहे. उदाहरणार्थ अस्पृश्यतेची परंपरा घ्या. ही परंपरा तात्त्विक असूनही तिचा देशकालानुरूप वर्गशः आकार ठरवितां येतो. अस्पृश्यानें समाजांत पूर्णपणें वावरून सर्व सुखसाधनांचा यथायोग्य उपभोग घ्यावयाचा, त्याच्यावर कोणतेंही बंधन न लादतां, स्नानादि कर्म करण्याचें कष्ट स्पृश्यांनींच मुकाट्यानें घ्यावयाचें, हें संकोचाचें उदाहरण झालें. चतुरंग सैन्याची आमची परंपरा ही तात्कालिक आहे. तेव्हां आज ती निरुपयोगी आहे. प्राचीन देवमंदिरांवरील नग्नाकृति करण्याची परंपरा भावनामूलक दिसते. आकाशांतून कोसळणाऱ्या विजेवर हा तोडगा आहे अशी भावना तिच्या बुडाशीं दिसते. मानसशास्त्राच्या दृष्टीनें शृंगार हा आदिरस ठरतो

असला तरी त्याची उत्तानता कांहीं शास्त्रीय ठरत नाहीं. आमच्या साहित्यांतली उत्तान शृंगाराची परंपरा समाजदृष्ट्या अहितकारक असल्या-मुळें तिचा आज त्यागच केला पाहिजे. असो. आतां आपण राष्ट्रियत्वाच्या सातव्या अंगाकडे वळूं.

परकीय आक्रमण

राष्ट्रियत्वाचें सातवें अंग परकीय आक्रमणाविषयीं दक्षता हें आहे. या अंगास दोन बाजू आहेत. एक आंतली बाजू व दुसरी बाहेरची बाजू. परकीयांचा आघात होऊं नये याकरतां जी सज्जता ठेवावी लागते ती आंतली बाजू होय. समाजाची तेजोवृत्ति कायम ठेवण्याकरतां परकीय राष्ट्रांशी जीं युद्धें खेळावीं लागतात तीं बाहेरची बाजू होय. प्रथमतः आपण पहिल्या बाजूचा विचार करूं. एकाच लाभहानीकरितां समाजानें जें रक्त सांडविलें असतें तें राष्ट्राभिमान अधिक दृढ करणारें असतें. Ramsay Muir नें " Death is the seal of Nationality that stamps it as sacred. More binding than common blood in the veins is the blood that is shed in common." असें जें म्हटलें आहे तें यथार्थ आहे. Gooch वगैरे विचारकांनींही असेंच मत प्रदर्शित केलें आहे. हिंदुस्थानांत हिंदु-मुसलमानांचा प्रश्न फार बिकट होऊन बसला आहे. त्याचीं अनेक कारणें आहेत. परंतु त्यांतील हेंही एक आहे कीं, कोणत्याही सामान्य लाभहानीकरतां मुसलमानांनीं हिंदूंच्या बरोबर आपलें रक्त सांडविलें आहे असें कधींच झालें नाही. तेव्हां हिंदूंना मुसलमानांच्या राष्ट्रीयपणाबद्दल विश्वास कां वाटावा? तसा तो वाटावा असा आग्रह धरणें म्हणजे शुद्ध वेडेपणाच नव्हे काय? टक्कर देण्यांत राष्ट्रियत्व जिवंत राहतें ही गोष्ट समजण्यास फार सोपी आहे. त्याकरतां कांहीं शास्त्रांचा खटाटोप नको. किंबहुना असें म्हणतां येईल कीं, राष्ट्राचें दैनंदिन जीवन भावमय असल्यामुळें त्याला आपल्या तात्विक आत्म्याचें भान येण्यास पुष्कळदां विरोधच उपकारक ठरतो. द्वन्द्वमय

जगांत असा **विरोध** उत्पन्न होणें **अपरिहार्य** असतें. तेव्हां या विरोधास तोंड देण्याकरतां समाजाची क्रियाशक्ति व इच्छाशक्ति यांना अखंड पीळ देत रहावें लागतें.

आतां आपण दुसऱ्या बाजूचा विचार करूं. राष्ट्रास चिरकाल शांतता लाभणें **घातक** असतें हें तत्त्व भारतीय इतिहासावरून पुरतेपणीं लक्ष्यांत येतें. यशोधर्म्याच्या हूणविजयानंतर भारतास पांचसहाशें वर्षें जी शांतता लाभली त्यामुळें आमचें राष्ट्र **निकस** व **ढिलें** पडलें. आमच्या सांस्कृतिक दर्जास अनुसरून अश्वमेधादि यज्ञांच्या रूपानें आम्ही परकीयांशीं मुकाबला देण्याची आमची परंपरा कायम ठेवली असती तर भारताचा ऱ्हास झाला नसता. **विरोध** ही चीजच अशी आहे कीं, जिच्यामुळें समाजाचें एकराष्ट्रियत्व व्यवस्थित व सकस राहतें. तो नाहींसा झाल्यामुळें राष्ट्रही नाहीसें होऊं लागतें. परकीयांशीं आक्रमकतेनें वागण्यानेंही एकराष्ट्रियत्व मजबूत राहतें. ही आमची परंपरा आम्ही सोडल्यामुळें तिच्या फायद्यालाही आम्ही मुकलो. प्रो. पिल्सबरी यानें आपल्या पुस्तकांत म्हटलें आहे कीं, " Nationality thrives on opposition and any attempt to crush it results in its increase or a new birth. This statement is illustrated by every attempt that has been made in history to discourage or destroy nationality by force or by law. A nation is strongest when fighting. Nationality is a twofold sentiment, of helpfulness towards all within the group, and of distrust of all without it. Coherence is emphasized when there is opposition." (Psychology of Nationalism & Internationalism P. 89.) हें म्हणणें परकीयांचें आपल्यावर आक्रमण व आपलें परकीयांवर आक्रमण या दोन्हीही बाबतींत लागूं पडतें. **अश्वमेधाची परंपरा** आजच्या जगास **अनुसरून** आम्हांस पुनः उत्पन्न केली पाहिजे. या परंपरेचा फायदा आम्हांस व जगासही होईल. आमचीं आक्रमणें दुसरीं राष्ट्रें नष्ट करणारीं

मुळींच नसल्यामुळें, उलट त्यांचें स्वातंत्र्य त्यांना सन्मानपूर्वक परत करणारीं असल्यामुळें, इतर समाजांचें राष्ट्रियत्व जागृत होऊन बलिष्ठ होईल आणि आक्रमकतेमुळें आमचेंही राष्ट्रियत्व जागृत व बलिष्ठ राहील. जगांत निसर्गधीरता उत्पन्न होईल. हा काय कमी फायदा आहे? राष्ट्रियत्वाच्या सप्तांगांचाही विचार येथें समाप्त झाला आहे. आतां आपण या सबंध विषयाचा संक्षेपतः उपसंहार करूं.

★

राष्ट्रीयत्वाचें स्वरूप

ज्या मानवजीवनध्येयविषयक म्हणजेच आंतरजीवनविषयक भावना मानवजीवन दिव्य आणि रम्य करतात व ज्या मनोभूमिकेवर केंद्रित होऊन देश, वंश, भाषा व तद्गत वाङ्मय, राज्यतंत्र, आर्थिक हितैकता (community of Economic Interests) व परकीय आक्रमणविषयक दक्षता या सात अंगांनीं अभिव्यक्त होतात त्या सर्व मिळून राष्ट्रीयत्वाचें स्वरूप होय. अशा तऱ्हेच्या राष्ट्रीयत्वानें युक्त असा जनसमाज म्हणजे राष्ट्र व त्या समाजाचा घटक हा राष्ट्रिय होय.

———

उपसंहार

राष्ट्रियत्व म्हणजे काय व राष्ट्रिय कोणास म्हणावे या प्रश्नाचें उत्तर आतां वाचकांस **सुलभ** होईल. ज्यांच्या **अंतर्जीवनविषयक** कल्पना एक आहेत त्यांचें एक **राष्ट्र** होतें व या **अंतर्जीवनविषयक** कल्पना मानणारी व्यक्ति **राष्ट्रिय** ठरते हें लक्ष्यांत घेतल्यास हिंदुत्व **हेंच राष्ट्रियत्व** कसें ठरतें व **हिंदु हाच खरा राष्ट्रीय** कसा ठरतो हें सहज समजेल. वास्तविक पहातां हा प्रश्न विवाद्य असूं नये. प्रश्नही सरळ आहे व त्याचें उत्तरही सरळ आहे. असें असतां आमच्या देशांतील अनेक पक्षोपपक्ष आमची जी सारखी दिशाभूल करीत आहेत त्यापासून आम्हांस सदैव सावध असलें पाहिजे. अशा सावध व्यक्तींना एका ठिकाणीं जमवून, त्यांना एकविचारानें भरून राष्ट्रियत्वाच्या जीर्णोद्धाराकरतां तयार करावयाचें हें आमचें आज **जीवितकार्य** आहे. ज्यांना राष्ट्रद्रोहाच्या नरकांत **खितपत** पडूं नये असें वाटत असेल त्यांनीं आपण होऊन या कार्याकरता उद्युक्त झाले पाहिजे. आम्हाला निराश होण्याचें कांहीच कारण नाहीं. उलट जगाचा इतिहास हें दाखवितो कीं, हिंदुस्थानकडे फार मोठी **कामगिरी** यावयाची आहे. अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध, फ्रेंच राज्यक्रान्ति व रशियन राज्यक्रान्ति या जगावर उत्तरोत्तर अतिशय परिणाम करणाऱ्या घटनांवरून असें दिसतें कीं, **क्रान्तीचें यज्ञकुण्ड पूर्वेकडेच चालून येत आहे.** भारतीय थोर द्रष्ट्यांना असें दिसत आहे कीं, "Understand that India is still living because she has her own quota yet to add to the general store of world's civilization." (Swami Vivekananda) तेव्हां चित्तविभ्रान्त होऊन आम्ही हातपाय गाळणें म्हणजे आत्मनाश करणेंच नव्हे काय ?

हिन्दूंनो, भारतास अधूनमधून जर्जरता येत असली तरी तो मर्त्य नाहीं, तो अमर आहे. लाख शत्रूंचे हल्लेही त्यास छेदूं शकणार नाहींत.

'हिंमत सोडुं नये पुनः सर्व येइल उदयाला'

प्रभाकर शाहीर.
